14 वर्ष वर्धापन दिन

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३२० ■ शनिवार, दि.३० मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## 'गजानन नागरी'च्या ठेवीदारांचे पैसे परत मिळणार की नाही ?

# 25 कोटींवर डल्ला मारूनही प्रशासन, लोकप्रतिनिधी गप्प !

**▶▶ राज्यात 19 हजार पतसंस्थांमधील 90 हजार कोटींच्या ठेवी किती सुरक्षित ▶▶ पतसंस्थांना विमा कवच नसल्याने सर्वसामान्य गुंतवणूकदार मात्र हतबल**

प्रतिनिधी ३० मे

**अकोला** :सहकारी क्षेत्रातील वाढत्या भ्रष्टाचाराने आता सर्वसामान्यांच्या कष्टाच्या पैशांवर दरोडा टाकण्यास सुरुवात केली आहे. याचे ताजे आणि धक्कादायक उदाहरण म्हणजे 'गजानन नागरी सहकारी पतसंस्था'. अकोलेकरांच्या तब्बल २५ कोटी रुपयांवर डल्ला मारला गेला असतानाही प्रशासन आणि पोलीस यंत्रणा कमालीची शांत का, असा संतप्त सवाल आता अकोल्यातील नागरिक विचारत आहेत. या पतसंस्थेतील हजारो ठेवीदारांचे भवितव्य आता अंधारात सापडले असून, त्यांचे हक्काचे पैसे त्यांना परत मिळणार की नाही, यावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वयाचे कारण पुढे करत दोघापैकी एका आरोपीबद्दल दाखविली जाणारी सहानुभूती खरच गरजेची आहे काय याचा ही तपास होण्याची गरज आहे. अकोलेकरांची कोट्यावधीची फसवणुक झाली असताना लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांची चुप्पी का अशी विचारणा आता होत आहे.

### पोलिसांच्या 'प्रामाणिक' तपासावरच ठेवीदारांची आस !

▶▶ गजानन नागरी पतसंस्थेच्या संचालकांनी आणि अध्यक्षांनी हा २५ कोटींचा घोटाळा कसा केला, याची कुंडली ऑडिट रिपोर्ट (अंकेक्षण अहवाल) मध्ये स्पष्टपणे मांडलेली आहे. आर्थिक गुन्हे शाखेने या सर्व प्रकरणाचा प्रामाणिक तपास केला तरच या प्रकरणात अकोल्यातील ठेवीदारांना हक्काचे पैसे परत मिळतील. या सहकारी पतसंस्थेच्या संस्थाध्यक्षांनी नेमके कुठे पैसे गुंतवले ? हे पोलिसांना पुराव्यानिशी सिध्द करावे लागणार आहे. कोणाच्या खात्यात कोट्यवधी रुपये वळते केले ? याचा छडा पोलिसांना लावावा लागणार आहे. कुठल्या कर्जदाराला कोणतेही तारण न घेता (विनातारण कर्ज) खिरापत म्हणून पैसे वाटले ?. त्याने पैसे परत करण्याची तयारी न दाखविल्यास त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची गरज आहे. जाणूनबुजून कर्ज वसुली कोणाकडून केली नाही ?याचा ही तपशील पोलिसांना जमा करावा लागेल. अवसायक (लिक्विडीटर) यांच्या एन्ट्रीनंतर अनेक वर्षांनी ठेवीदारांना पैसे परत मिळण्याची आशा आहे. यातील काही प्रश्नांची उत्तरे ऑडिट रिपोर्टमध्ये असूनही पोलिसांकडून अद्याप म्हणावा तसा कडक कायदेशीर बडगा उगारला गेलेला नाही. पोलिसांनी जर या ऑडिट रिपोर्टचा सखोल अभ्यास करून 'प्रामाणिक आणि निष्पक्ष' तपास केला, तरच ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळण्याची शक्यता आहे, अन्यथा नाही !.

### खाजगी ऑडिटचा 'राजमार्ग' की फसवणुकीचा कट?

▶▶ सहकार कायद्यात बदल करून सहकारी पतसंस्थांचे ऑडिट खाजगी संस्थांमार्फत करण्याची परवानगी देणे, हा बुडणाऱ्या पतसंस्थांसाठी आणि भ्रष्ट संचालकांसाठी सद्य परिस्थिती लपवण्याचा 'राजमार्ग' ठरला आहे. यामुळे पतसंस्थेची खरी आर्थिक परिस्थिती ग्राहकांपर्यंत आणि ठेवीदारांपर्यंत पोहोचतच नाही. काही खाजगी ऑडिटर हे थेट संचालकांच्या हातातील बाहुले बनले असून, ते पतसंस्थेच्या अंतर्गत घोटाळयांवर पांघरूण घालत असल्यामुळे ठेवीदारांची उघड फसवणूक होत असल्याची ओरड आता सुरू झाली आहे.




### ठेवींना विमा कवच नाही; मग सरकार बोर्ड का लावत नाही?

▶▶ सर्वात मोठी आणि धक्कादायक बाब म्हणजे, सहकारी पतसंस्थांमधील ठेवींना कोणतेही विमा सुरक्षा कवच नसते ! रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत येणाऱ्या कोणत्याही बँकेत (जिल्हा मध्यवर्ती बँक, नागरी सहकारी बँक किंवा व्यापारी बँक) ५ लाख रुपयांपर्यंतच्या ठेवींना अ्घ्णउण् (ठेव विमा आणि पतहमी महामंडळ) चे विमा संरक्षण असते. मात्र, साध्या सहकारी पतसंस्थांना हे विमा कवच अजिबात लागू नाही. सहकारी बँकांमध्ये ५ लाखांपर्यंतचा विमा असतो, पण पतसंस्थेमधील तुमची संपूर्ण रक्कम ही संपूर्णपणे तुमच्या स्वतःच्या जबाबदारीवर असते. जर पतसंस्थेमध्ये विमा सुरक्षा नाही, तर राज्य सरकार अशा पतसंस्थांच्या बाहेर 'येथील ठेवींना विमा कवच नाही' असा जाहीर बोर्ड लावण्याचे आदेश का देत नाही ? जनतेची दिशाभूल का केली जात आहे ?. अशी विचारणा आता होत आहे.

### ९०,५०० कोटींच्या ठेवी असुरक्षित; सरकारच्या योजना कागदावरच !

▶▶ सध्या महाराष्ट्रात १९,९४८ सहकारी पतसंस्था कार्यरत असून, त्यांच्याकडे सर्वसामान्यांचे तब्बल ९०,५०० कोटी रुपये जमा आहेत. या ठेवी सुरक्षित ठेवण्यासाठी राज्य शासनाने 'स्थिरीकरण व तरलता साहाय्य निधी' योजना तयार केली आणि १ जानेवारी २०२४ रोजी त्याला मान्यताही दिली. या योजनेचा लाभ १ एप्रिल २०२६ पासून पतसंस्थांना देण्याचा प्रस्ताव होता. मात्र, वर्ष २०२६ उजाडले तरीही अद्याप ही योजना पूर्णपणे लागू झालेली नाही. तसेच, लहान ठेवीदारांना विमा संरक्षण देण्यासंदर्भात शासन केवळ धोरण आखत आहे, त्याला कोणतीही अंतिम मान्यता मिळालेली नाही. शासनाचे हे केवळ 'धोरण आखणे' सुरू आहे, ते अद्याप 'फायनल' नाही, यामुळे ठेवीदार वाऱ्यावर सोडले गेले आहेत.

### ग्राहकांनो सावधान ! पैसा राष्ट्रीयकृत बँकेत किंवा पोस्टातच ठेवा

▶▶ गजानन नागरी पतसंस्थेत पैसे परत मिळत नसतानाही काही लोकांनी तिथे पैसे का गुंतवले, हा आता संशोधनाचा विषय ठरत आहे. नागरिकांनी आता तरी शहाणे होण्याची गरज आहे. आपला कष्टाचा पैसा केवळ राष्ट्रीयकृत बँकांमध्ये किंवा सुरक्षित अशा पोस्ट ऑफिसमध्ये गुंतवावा. थोडक्यात सांगायचे तर, जर आपण एखाद्या पतसंस्थेत पैसे गुंतवण्याचा विचार करत असाल आणि तिथे विम्याचे कवच नसेल, तर तो पैसा गुंतवणे ही ग्राहकांची /ठेवीदाराची मोठी चूक ठरेल. गजानन नागरी पतसंस्थेत ज्या प्रकारे ठेवीदारांना फटका बसला तो फटका बसण्यापूर्वीच ग्राहकांनी आपला पैसा काढून राष्ट्रीयकृत बँकांमध्ये ठेवणे हीच काळाची पाऊले आहेत !.

# 'मविआ'चे १५ जागांवर एकमत; दोन जागांचा निर्णय लवकरच !

प्रतिनिधी ३० मे

**मुंबई** : राज्यातील १७ जागांसाठी होत असलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे १७ पैकी १५ जागांवर एकमत झाले असून दोन जागांवरही लवकरच निर्णय होईल. काँग्रेस पक्ष चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव-लातूर-बीड या जागा लढवणार आहे तर राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्ष पुणे, ठाणे व सांगली-सातारा या ३ जागा आणि शिवसेना (उबाठा) रायगड, जळगाव, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजीनगर या ४ जागा लढवत आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. विधान परिषदेच्या जागा वाटपासंदर्भात महाविकास आघाडीच्या नेत्यांची बैठक यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये पार पडली. या बैठकीला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (श.प.) कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे, शिवसेना (उबाठा) नेते खासदार अनिल देसाई, आमदार अंबादास दानवे, आमदार मिलिंद नार्वेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अदिती नलावडे उपस्थित होते. सपकाळ पुढे म्हणाले की, विधान परिषदेच्या निवडणुकीतही सत्ताधारी पक्षाकडून पैशाचा वापर मोठ्या प्रामणावर सुरु आहे.

विरोधकांचे नगरसेवक पळवले जात आहेत, ५-५ लाख रुपये अॅडव्हान्स दिले आहेत.

# मनोज जरांगेंच्या उपोषणाला प्रारंभ!

प्रतिनिधी ३० मे

**मुंबई** : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून अंतरवालीत आमरण उपोषण सुरु केलं आहे. सातारा संस्थानचा जीआर काढा. गॅझेटरनुसार अर्ज करणाऱ्याला प्रमाणपत्र द्या, व्हॅलिडीटी द्या, नाही दिली तर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, असा आदेश काढावा, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली. मराठा समाज मोठा होऊ नये, असा विचार असणाऱ्यांची संख्या जास्त आहे.

# अकोल्यात उर्दू घर'वरून राजकारण तापले

## आ. पठाण यांनी खोटे श्रेय लाटू नये; भाजपच्या शेरूभाई यांचा थेट हल्ला

प्रतिनिधी ३० मे

**अकोला** : राजकारणात दुसऱ्याच्या कामाचे श्रेय स्वतःच्या पदरात पाडून घेण्याची काहींना सवयच जडली आहे. अकोल्यातील 'उर्दू घर'च्या मंजुरीवरून सध्या असेच 'क्रेडिट वॉर' सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर, भाजप अल्पसंख्याक आघाडीचे जिल्हाप्रमुख शेरूभाई यांनी प्रसिद्धी पत्रक जारी करत काँग्रेसचे आमदार साजिद खान पठाण यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. 'आमदारांनी खोटे श्रेय घेऊन अल्पसंख्याक समाजाची दिशाभूल करू नये, उर्दू घर ही महायुती सरकारचीच देण आहे,' असा रोखठोक दावा त्यांनी केला आहे.आमदार साजिद खान यांच्या या श्रेयाच्या राजकारणावर सडकून टीका करताना शेरूभाई यांनी एक प्रसिद्ध उर्दू शेर सादर केला.

शेरूभाई यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, काँग्रेस आमदारांना प्रत्येक गोष्टीत खोटे श्रेय घेण्याची जुनी सवय आहे. 'बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना' या म्हणीचा वापर करत त्यांनी टोला लगावला की, ज्या कामात काँग्रेसचे काहीच योगदान नाही, तिथे नाहक ढोल वाजवला जात आहे. भारतीय जनता पक्ष नेहमीच 'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास' या तत्त्वावर काम करत आला असून अल्पसंख्याक समाजाच्या खऱ्या विकासासाठी कटिबद्ध आहे.

२०१६ मध्ये तत्कालीन महायुती सरकारने ज्या भागात ३० टक्के किंवा त्याहून अधिक अल्पसंख्याक लोकसंख्या आहे, तिथे उर्दू भाषेच्या संवर्धनासाठी आणि लेखकांसाठी 'उर्दू घर' मंजूर करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला व त्याचा जीआर प्रसिद्ध केला. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेला मंजुरी दिली होती. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कामाला गती दिली आणि आता पुन्हा गृहमंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावाला अंतिम मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून दिला आहे.






## एक कुटुंब एक कनेक्शन

नव्या दुरुस्तीनुसार ज्या कुटुंबाकडे पहिल्यापासून पीएनजी कनेक्शन आहे, त्यांना त्यांच्याकडील एलपीजी कनेक्शन सोडावं लागेल. तेल पुरवठा कंपन्यांकडून घरगुती सिलेंडरचा गैरवापर, साठेबाजी आणि काळाबाजार याला रोखण्यासाठी पीएनजी आणि एलपीजीचा एकाच वेळी वापर करणाऱ्यांचा शोध घेणं सुरु केलं आहे. नव्या दुरुस्तीनंतरएकाच पत्त्यावर एलपीजी आणि पीएनजी अशी दोन कनेक्शन ठेवता येणार नाहीत. ज्या ठिकाणी पीएनजीची सुविधा उपलब्ध असूनही निश्चित वेळेत एलपीजीवरुन स्विच न झाल्यास निश्चित वेळेनंतर एलपीजीचा पुरवठा बंद केला जाऊ शकतो.

पीएनजी कनेक्शन मिळाल्यानंतर पुढील ३० दिवसांमध्ये एलपीजी कनेक्शन बंद करण्यास सांगण्यात आलं आहे.

# गुरू अर्जुनदेव हे शीख धर्मात शहीद झालेले पहिले गुरू !

गुरू अर्जुनदेव हे शीख धर्माचे पाचवे गुरू होत. गुरू अर्जन हे शीख धर्मात शहीद झालेल्या दोन गुरूंपैकी पहिले आणि एकूण दहा शीख गुरूंपैकी पाचवे होते. त्यांनी आदिग्रंथ नावाच्या शीख धर्मग्रंथाची पहिली अधिकृत आवृत्ती संकलित केली, जी नंतर गुरू ग्रंथ साहिबमध्ये विस्तारली. त्यांचा जन्म पंजाबमधील गोइंदवल येथे झाला, भाई जेठा यांचा सर्वात धाकटा मुलगा, जो नंतर गुरू राम दास झाला आणि गुरू अमर दास यांची मुलगी माता भानी. चौथ्या शीख गुरूंनी शहराची स्थापना केल्यानंतर आणि सरोवर बांधल्यानंतर त्यांनी अमृतसर येथे दरबार साहिबचे बांधकाम पूर्ण केले. गुरू अर्जन यांनी पूर्वीच्या गुरूंची आणि इतर संतांची स्तोत्रे शिख धर्मग्रंथाची पहिली आवृत्ती आदि ग्रंथात संकलित केली आणि हरिमंदिर साहिबमध्ये स्थापित केली.

गुरू अर्जन यांनी गुरू राम दास यांनी सुरू केलेल्या मसंद पद्धतीची पुनर्रचना केली आणि शिखांनी त्यांच्या उत्पन्नाचा, वस्तूंचा किंवा सेवेचा एक दशांश भाग शिख संघटनेला (दासवंध) दान करावा असे सुचवून. मसंदने केवळ हा निधी गोळा केला नाही तर शीख धर्माचे सिद्धांत देखील शिकवले आणि त्यांच्या प्रदेशातील नागरी विवाद मिटवले. दसवंदने गुरुद्वारा आणि लंगर (सामायिक सांप्रदायिक स्वयंपाकघर) बांधण्यासाठी वित्तपुरवठा केला.



मुघल सम्राट जहांगीरच्या आदेशानुसार गुरू अर्जन यांना अटक करण्यात आली आणि त्यांना इस्लाम स्वीकारण्यास सांगितले. त्याने नकार दिला, छळ करण्यात आला आणि १६०६ सीई मध्ये त्याला फाशी देण्यात आली. ऐतिहासिक नोंदी आणि शीख परंपरेनुसार गुरू अर्जन यांना बुडून मारण्यात आले की अत्याचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला हे स्पष्ट नाही. त्यांच्या हौतात्म्याला शीख धर्माच्या इतिहासातील जलसमाधी मानली जाते. २००३ मध्ये शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीने जारी केलेल्या नानकशाही दिनदर्शिकेनुसार मे किंवा जूनमध्ये गुरू अर्जन यांचा शहीदी दिवस म्हणून स्मरण केले जाते.

गुरू अर्जन यांचा जन्म गोइंदवल येथे बीबी भानी आणि जेठा सोधी यांच्या पोटी झाला. बीबी भानी या गुरू अमर दास यांच्या कन्या होत्या आणि त्यांचे पती जेठा सोधी नंतर गुरू रामदास म्हणून ओळखले जाऊ लागले. गुरू अर्जन यांचे जन्मस्थान आता गुरुद्वारा चौबारा साहिब म्हणून स्मारक केले जाते. त्यांना पृथ्वीचंद आणि महादेव असे दोन भाऊ होते. विविध शीख इतिहासकारांनी त्याचे जन्मवर्ष १५५३ किंवा १५६३ असे दिले आहे, नंतरचे जन्मवेळ हे विद्वानांच्या सहमतीने खरे जन्माचे वर्ष म्हणून स्वीकारले जाते आणि १५ एप्रिल ही स्वीकारलेली जन्मतारीख आहे. गुरू अर्जन यांनी त्यांच्या आयुष्यातील पहिली ११ वर्षे गोइंदवाल येथे आणि पुढील सात वर्षे वडिलांसोबत रामदासपूर येथे घालवली. शीख परंपरेनुसार, त्यांच्या वडिलांनी त्यांच्या पहिल्या चुलत भाऊ सहारी मलच्या मुलाच्या लग्नात सहभागी होण्यासाठी तसेच शीख मंडळीची स्थापना करण्यासाठी पाठवल्यानंतर तरुणपणी तो लाहोरमध्ये दोन वर्षे राहिला होता. वडिलांच्या मृत्यूनंतर १५८१ मध्ये त्यांची शीख गुरू म्हणून नियुक्ती झाली. गुरू रामदास हे सोढी उपजातीतील खत्री होते. गुरू अर्जन यांच्या उत्तरार्धात, गुरुपद गुरू रामदास यांच्या सोढी कुटुंबात राहिले.

शीख परंपरेनुसार, त्याच्या फाशीच्या आधी गुरू अर्जनने आपला मुलगा आणि उत्तराधिकारी हरगोविंद यांना शस्त्रे उचलण्याची आणि अत्याचाराचा प्रतिकार करण्याची सूचना दिली. त्याच्या फाशीमुळे शीख पंथ सशस्त्र बनले आणि मुघल राजवटीत छळाचा प्रतिकार करू लागले. मायकेल बार्न्स म्हणतात की गुरू अर्जुन यांचा संकल्प आणि मृत्यू यामुळे शिखांचा विश्वास दृढ झाला की, 'वैयक्तिक धार्मिकतेला नैतिक शक्तीचा गाभा असला पाहिजे. एक सद्गुणी आत्मा एक धैर्यवान आत्मा असणे आवश्यक आहे. एखाद्याच्या विश्वासासाठी चाचणी सहन करण्याची इच्छा ही एक धार्मिक अट होती.

# खेळाडू न बनताही क्रीडा क्षेत्रात कमवा लाखो रुपये !



## स्पोर्ट्स मॅनेजमेंट आणि सायन्समध्ये करिअर

आजच्या आधुनिक जीवनशैलीत 'स्पोर्ट्स आणि फिटनेस' या क्षेत्राकडे पाहण्याचा तरुणाईचा दृष्टिकोन वेगाने बदलत आहे. हा क्षेत्र आता केवळ मैदानावर खेळण्यापुरता किंवा जिममध्ये ट्रेनिंग देण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर यात करिअरचा एक मोठा खजिना दडला आहे. खेळाडूंच्या मागे असणारी तज्ज्ञांची मोठी टीम, स्पोर्ट्स मॅनेजमेंट, न्यूट्रिशन आणि ऑनलाईन फिटनेस कोचिंग यांमुळे या क्षेत्रात उद्योग आणि रोजगाराच्या अभूतपूर्व संधी निर्माण झाल्या आहेत. १० वी, १२ वी आणि पदवीनंतर या क्षेत्रातील विविध कोर्सेसद्वारे यशस्वी करिअर घडवता येते.

स्पोर्ट्स आणि फिटनेस' या क्षेत्राकडे पाहण्याचा तरुणाईचा दृष्टिकोन बदलला आहे. पण त्याच वेळी एक वास्तवही आहे, या क्षेत्रात खरेच किती विविध संधी आहेत, याची स्पष्ट आणि संपूर्ण माहिती अजूनही नाही. स्पोर्ट्स म्हणजे फक्त क्रिकेट किंवा फुटबॉल खेळाडू होणे नाही आणि फिटनेस म्हणजे फक्त जिममध्ये ट्रेनिंग देणे नव्हे.

आज एक खेळाडू घडवण्यामागे एक मोठी टीम असते. कोच जो रणनीती शिकवतो, फिजिओथेरपिस्ट जो दुखापतीतून रिकव्हरी करायला मदत करतो, स्पोर्ट्स सायकोलॉजिस्ट जो मानसिक ताकद वाढवतो आणि अगदी कमेंटेटर जो खेळ लोकांपर्यंत पोहोचवतो. स्पोर्ट्समध्ये तुम्ही अॅथलिट, कोच, असिस्टंट कोच, स्पोर्ट्स फिजिओथेरपिस्ट, स्पोर्ट्स सायकोलॉजिस्ट, रेफरी किंवा अंपायर, स्पोर्ट्स अॅनालिस्ट, कमेंटेटर किंवा स्पोर्ट्स जर्नालिस्ट होऊ शकता. याशिवाय, स्पोर्ट्स मॅनेजमेंटमध्ये इव्हेंट मॅनेजर, टीम मॅनेजर, टॅलेंट स्काऊट किंवा स्पोर्ट्स अॅडमिनिस्ट्रेटर अशा भूमिका उपलब्ध आहेत.

**जीवन बदलण्याची ताकद असलेले करिअर**

आता फिटनेस करिअरबद्दल माहिती घेऊ या. आजच्या लाइफस्टाइलमध्ये फिट राहणे ही फक्त गरज नाही तर एक मोठी इंडस्ट्री झाली आहे. जिम ट्रेनर, योगा इन्स्ट्रक्टर, न्यूट्रिशन एक्सपर्ट, वेलनेस कोच अशा अनेक भूमिका आता लोकप्रिय झाल्या आहेत. जेव्हा एखादी व्यक्ती वजन कमी करते, फिट होते किंवा आजारातून बरी होते, तेव्हा त्यामागे एक फिटनेस प्रोफेशनलची मेहनत असते. ही फक्त शरीराची नाही तर जीवन बदलण्याची ताकद असलेले करिअर आहे.

**फिटनेस क्षेत्रातील संधी**

फिटनेस क्षेत्रात पाहिले तर पर्सनल फिटनेस ट्रेनर, जिम इन्स्ट्रक्टर, योगा शिक्षक, न्यूट्रिशन कन्सल्टंट, वेलनेस कोच, पिलाटेस किंवा झुंबा इन्स्ट्रक्टर, स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग कोच आणि कॉर्पोरेट फिटनेस कन्सल्टंट अशा अनेक संधी आहेत. आज अनेक जण स्वतःचा फिटनेस स्टुडिओ किंवा ऑनलाइन कोचिंग सुरू करून उद्योजक म्हणूनही काम करत आहेत.

**दहावी किंवा बारावीपासून तयारी सुरू करता येते**

स्पोर्ट्स आणि फिटनेस करिअरमध्ये प्रवेश करण्याचे अनेक मार्ग आहेत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'एकच रस्ता नाही' हे समजून घेणे. तुमची दहावी किंवा बारावीपासूनच या क्षेत्रात सुरुवात करता येते. अनेक विद्यार्थी स्टेट, नॅशनल किंवा युनिव्हर्सिटी पातळीवर खेळून पुढे प्रोफेशनल स्पोर्ट्स करिअरमध्ये प्रवेश करतात.

काही जण स्पोर्ट्स कोटा किंवा स्पोर्ट्स अॅकॅडमीच्या माध्यमातूनही पुढे जातात, जिथे त्यांना ट्रेनिंग आणि स्पर्धा दोन्हीची संधी मिळते.

बारावीनंतर बीएससी इन स्पोर्ट्स सायन्स, बीएड (फिजिकल एज्युकेशन) किंवा पदवीनंतर बीपीएड (बॅचलर इन फिझिकल एज्युकेशन) आणि फिटनेस आणि न्यूट्रिशनशी संबंधित डिप्लोमा कोर्सेसमधून या क्षेत्रात प्रवेश करता येतो.

एमपीएड आणि स्पोर्ट्स मॅनेजमेंटमधील एमबीएसारखे अभ्यासक्रम निवडता येतात. सध्या स्पोर्ट्स, फिटनेस क्षेत्रात तांत्रिक कौशल्यांचेही महत्त्व वाढत आहे.

## दिन विशेष

### अंतराळात उगवला जाणारा पहिला भाजीपाला बटाटा!

भारतात बटाटा १६ व्या शतकात पोर्तुगीज व्यापाऱ्यांमार्फत आला. सध्या भारतात उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि बिहार ही बटाटा उत्पादक प्रमुख राज्ये आहेत. अंतराळात उगवला जाणारा पहिला भाजीपाला बटाटा होता. १९९५ मध्ये नासाच्या मोहिमेत अंतराळात बटाट्याचे पीक घेण्यात आले होते.जगात तांदूळ आणि गव्हाखालोखाल बटाट्याचे सर्वाधिक सेवन केले जाते.

दरवर्षी ३० मे रोजी आंतरराष्ट्रीय बटाटा दिवस साजरा केला जातो. जागतिक अन्नाचा मुख्य स्रोत आणि आहारातील बटाट्याचे महत्त्व याविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने डिसेंबर २०२३ मध्ये ठराव मंजूर करून या दिवसाची स्थापना केली. ३० मे २०२४ रोजी जगात पहिल्यांदाच अधिकृतरीत्या आंतरराष्ट्रीय बटाटा दिन साजरा करण्यात आला. या कंदमुळे असलेल्या पिकाचा उगम हजारो वर्षांपूर्वी दक्षिण अमेरिकेतील पेरू आणि बोलिव्हियाच्या पर्वतरांगांमध्ये झाला. जगातील कोट्यवधी लोकांसाठी बटाटा हे मुख्य अन्न आहे. यामध्ये भरपूर कर्बोदके, पोटॅशियम आणि व्हिटॅमिन 'सी' असते. दुष्काळ, थंड हवामान आणि कमी कस असलेल्या जमिनीतही बटाट्याचे पीक उत्तम प्रकारे येऊ शकते. लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उपजीविकेसाठी आणि अर्थव्यवस्थेसाठी हे पीक अत्यंत महत्त्वाचे आहे.

स्वातंत्र्य जेव्हा मिळाले तेव्हाही नेहरूंना वाटले होते बटाट्याची पुरेशी लागवड भारतात होत नाही. म्हणून १९४९ साली नेहरूंनी 'सेंट्रल पोटॅटो रिचर्स इन्स्टिटयूट' ची स्थापना केली. नंतर १९५० साली अर्धा टन बटाटा घेत होतो. पुढील १० वर्षींनी तो १२ पटीने वाढला. आज बटाट्याच्या साडेचार हजार प्रजाती आहेत. त्यांच मुळ दक्षिण आफ्रिका आहे. बटाटा शब्द देखील तिथलाच आहे. सतराव्या शतकाच्या सुरुवातील ब्रिटिशांनी सुरतेली जी वखार बांधली तिथे बटाटा होता. तिथून मग कदाचित गोव्याला गेला असं मानलं जातं. तेव्हा युरोपमध्ये देखील बटाटा पसरत होता. तेथील उच्च वर्गीयांचा बटाट्याच्या पिकाला विरोध होता. कारण बटाटा दिसायला ओबडधोबड होता. पण बटाट्याची लागवड सोपी तसेच त्याचे पदार्थ बनवणे देखील सोपे आहे. याचे पदार्थ बनवणारे लोक आळशी असतात असा समज सर्वत्र पसरला. तसेच ते गरिबांच पोट भरणारं पदार्थ ठरला. पण सतराव्या शतकात आयरलँड मध्ये दुष्काळ पडला तेव्हा बटाट्यामुळे लाखो लोक जगली. त्यामुळे वसाहतवादी लोकांना कळले की बटाटा हे उपयुक्त पिक आहे. अठराव्या आणि एकोणीसाव्या शतकात पिकांचा प्रसार हा ब्रिटिशांमुळे वाढला. एकोणीसाव्या



आज आंतरराष्ट्रीय बटाटा दिवस

शतकाच्या सुरुवातीला १८२० साली अॅग्रीकल्चर सोसायटी बंगालात स्थापन झाली. तेव्हा आपण नवीन पिक आणायची. युरोपिय लोकांना परक वाटून नये यासाठी त्यांच्या पिकांची लागवड केली पाहिजे.

**महाराष्ट्राच्या मातीत कसा रुजला बटाटा?**

दरवर्षी ३० मे रोजी आंतरराष्ट्रीय बटाटा दिन साजरा केला जातो. बटाटा हा सर्व भाज्यांमध्ये मिक्स होतो. तसेच बटाट्यापासून विविध पदार्थ बनवणे देखील सोपे आहे. अगदी फ्रेंच फ्राईजपासून ते भज्यांपर्यंत बटाट्यापासून स्वादिष्ट पदार्थ बनवले जातात. बटाटा हे पिक कोणत्याही वातावरणात वाढू शकते. जगभरात बटाट्याते मुख्य अन्न म्हणून पौष्टिकमुल्य आणि महत्व याविषयी जागरुकता वाढवण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. या दिनाबद्दल बटाट्याचा लोकमान्य टिळक आणि महात्मा फुले यांच्याशी घनिष्ठ संबंध आहे.

पुण्यात चहा प्रकरण झाले होते. चहा प्यायल्याने लोकांवर बहिष्कार पडला. एकमेकांच्या ओळखीने सर्वंच लोकांवर पुण्यात बहिष्कार पडला. नंतर शुल्कपक्ष आणि कृष्णपक्ष असे दोन गट पडले. टिळक हे चहा पिणाऱ्यांच्या बाजूने होते. नंतर त्यांनी १५ ते २० वर्ष वर्तमान पत्रातून जे सनातनी होते त्यांच्याशी वाद घातला. तर एक पत्र आले होते. जे केसरी वृत्तपत्रात छापलं गेलं होतं. त्यात असे लिहिलं होते की वेदांमध्ये किंवा पुराणांमध्ये कुठेही चहाचा उल्लेख नसल्याने चहा आपल्याला निषिद्ध आहे. त्यावर टिळकांनी विचारले होतं की बटाटा पुराणांमध्ये किंवा वेदांमध्ये नाही मग तो कसा तुम्हाला कसा चालतो. यानंतर सर्वांचा बटाटा हा आवडायला लागला.

बटाटा खाण्याबाबत भीती निर्मुलनाचे महत्वाचे काम महात्मा फुले यांनी केले आहे. महात्मा फुल दर रविवारी मांजरीजवळ जी जमिन होती. तिथे त्यांनी सर्व पिकं लावली होती. तिथे ते सर्व शेतकऱ्यांना बोलवायचे. सावित्री बाई सर्वांसाठी भाकरी घेऊन यायच्या. महात्मा फुले शेतात राहायचे. शेतकऱ्यांनी ही सर्व पिके लावण्यास प्रोत्साहन द्यायचे आणि तुम्हाला याचे पैसे मिळतील. तसेच तुमचे या पिकांमुळे पोट भरेल असे सांगायचे. महात्मा फुले शेतकऱ्यांशी संवाद साधायचे. ते त्यांना समोर प्रत्येक भाजी खाऊन दाखवायचे आणि म्हणायचे बघा मला काहीच झाले नाही.

# मेडिकल विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी आता मिळणार १० वर्षे!

## नियम मोडल्यास शिक्षण सुटणार!

**पुणे :** राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी एक मोठा आणि महत्त्वपूर्ण बदल सुचवला आहे. 'ग्रॅज्युएट मेडिकल एज्युकेशन (सुधारणा) रेग्युलेशन्स, २०२६' या मसुदा अधिसूचनेनुसार, विद्यार्थ्यांना आता एमबीबीएस अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी १० वर्षांची मुदत मिळणार आहे. सध्याची ९ वर्षांची मर्यादा १ वर्षाने वाढवण्याचा हा प्रस्ताव आहे. या १० वर्षांच्या कालावधीत १ वर्षाची 'रोटेटरी मेडिकल इंटर्नशिप' समाविष्ट असेल. मात्र, प्रथम वर्ष एमबीबीएससाठी जास्तीत जास्त ४ संधी असतील, त्यानंतर प्रवेश रद्द केला जाईल.

'एनएमसी'ने 'ग्रॅज्युएट मेडिकल एज्युकेशन (अमेंडमेंट) रेग्युलेशन्स, २०२६' या मसुदा अधिसूचनेद्वारे हा बदल सुचवला आहे. वैद्यकीय शिक्षणादरम्यान आरोग्यविषयक अडचणी, वैयक्तिक कारणे किंवा शैक्षणिक ताणामुळे अनेक विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करता येत नसल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, या बदलासोबतच आयोगाने काही कठोर अटीही स्पष्ट केल्या आहेत. प्रथम एमबीबीएस वर्ष उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त चार संधी दिल्या जाणार आहेत. चार प्रयत्नांनंतरही विद्यार्थी उत्तीर्ण झाला नाही, तर त्याला वैद्यकीय शिक्षण सोडावे लागणार आहे. तसेच, प्रवेश घेतल्यापासून इंटर्नशिपसह संपूर्ण एमबीबीएस अभ्यासक्रम दहा वर्षांत पूर्ण न झाल्यास विद्यार्थ्याला पदवी मिळणार नाही.

वैद्यकीय महाविद्यालयांमधील वसतिगृहांच्या खोल्या वर्षानुवर्षे अडवून ठेवण्याच्या प्रकारांनाही या निर्णयामुळे काही प्रमाणात आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक विद्यार्थी पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सीईटीची तयारी करताना मुद्दाम इंटर्नशिप लांबवत असल्याचे प्रकार समोर येत होते.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने 'ग्रॅज्युएट मेडिकल एज्युकेशन (अमेंडमेंट) रेग्युलेशन्स, २०२६' या मसुदा अधिसूचनेद्वारे वैद्यकीय शिक्षणाच्या कालावधीत महत्त्वाचा बदल सुचवला आहे.

१ वर्षाची वाढ: सध्या देशात एमबीबीएस अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी कमाल ९ वर्षांची मर्यादा लागू आहे. विद्यार्थ्यांचा ताण आणि वैयक्तिक अडचणी लक्षात घेऊन ही मर्यादा १० वर्षे करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

इंटर्नशिपचा समावेश : या सुधारित १० वर्षांच्या एकूण कालावधीमध्ये विद्यार्थ्याला त्याची १ वर्षाची अनिवार्य 'रोटेटरी मेडिकल इंटर्नशिप' पूर्ण करणे देखील बंधनकारक असणार आहे.

बदलाची पार्श्वभूमी: वैद्यकीय शिक्षणादरम्यान अनेक विद्यार्थ्यांना गंभीर आरोग्यविषयक अडचणी, कौटुंबिक/वैयक्तिक कारणे किंवा वाढत्या शैक्षणिक ताणाचा सामना करावा लागतो. यामुळे अनेक विद्यार्थी वेळेत परीक्षा देऊ शकत नाहीत, त्यांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

# अपघातग्रस्त कामगारांबाबत प्रत्यारोपण शस्त्रक्रियांच्या तातडीसाठी उपाययोजना करा

## कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

**मुंबई :** राज्यातील कारखान्यांमध्ये आणि औद्योगिक कंपन्यांमध्ये मशीनवर काम करताना अपघात होऊन हात गमवावा लागलेल्या कामगारांना पुन्हा पूर्ववत आयुष्य जगता यावे. अपघातग्रस्त कामगारांवर तातडीने शस्त्रक्रिया करून त्यांचे तुटलेले हात पुन्हा प्रत्यारोपित करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करण्यात याव्यात, असे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. या संदर्भातील प्रायोगिक तत्वावर पुणे जिल्ह्यातील औद्योगिक आस्थापनांमध्ये उपक्रम राबविण्यात यावा, अशा सूचनाही कामगार मंत्री फुंडकर यांनी दिल्या.



याबाबत नरिमन भवन येथे आयोजित बैठकीत मंत्री बोलत होते. बैठकीस दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ उपस्थित होत्या. तर प्रत्यक्षरीत्या अपर मुख्य सचिव आय ए कुंदन, कामगार आयुक्त एच. पी तुम्मोड, उपसचिव दीपक पोकळे उपस्थित होते.

अपघात झाल्यास पहिल्या काही तासांचा अवधी अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे हात प्रत्यारोपण करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांची अद्ययावत माहिती सर्व कारखाने आणि औद्योगिक आस्थापनांमध्ये असणे अनिवार्य करण्यात यावे, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत कामगारांना तातडीने मदत मिळेल. कामगारांना किंवा व्यवस्थापनाला अपघाताच्या वेळी त्वरित संपर्क साधता यावा आणि पुढील वैद्यकीय मार्गदर्शनासाठी दिशा मिळावी, यासाठी 'हेल्पलाईन क्रमांक' जारी करण्यात यावा, अशा सूचनाही कामगार मंत्री ॲड. फुंडकर यांनी दिल्या.

**बार्शिटाकळी नगरपंचायत**

**बार्शिटाकळी जि. अकोला.**

**दुरध्वनी क्रं. 07255-252825**

**Email:nagarpanchayat.barshitakali@gmail.com**

जा.क्र./न.प.बा./आ.वि./अभिकर्ता/निविदासुचना/2026/770 दिनांक-27/05/2026

**जाहीर निविदा सुचना**

बार्शिटाकळी नगरपंचायत, जि. अकोला यांच्या वतीने **''मान्सूनपूर्व कामाअंतर्गत बार्शिटाकळी नगरपंचायत, हद्दीतील आवश्यक ती मान्सूनपूर्व कामे करणे करीता अभिकर्ता नेमणे''** या कामाची जाहीर निविदा सुचना दिनांक- २७/०५/२०२६ रोजी कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदरील निविदा दिनांक. २७/०५/२०२६ दुपारी १२:०० वा. पासून ते दिनांक: ०२/०६/२०२६ रोजी दुपारी ३.०० वा पर्यंत निविदा सादर करता येतील. तरी इच्छुकांसाठी इतर अटी व शर्ती व निविदा प्रपत्र ई. बाबी कार्यालयाच्या आरोग्य विभागात कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

| स्वा/ - | स्वा/ - | स्वा/ - | स्वा/ - |
|---|---|---|---|
| अख्तर खातून अलीमोद्दिन | श्रीसैय्यद अबरार सैय्यद मीर | श्री. नवेद अहेमद खान जहागीर खान | श्री. राहुल कंकाळ |
| नगराध्यक्ष | उपनगराध्यक्ष | आरोग्य सभापती | मुख्याधिकारी |

शिक्का

**बार्शिटाकळी नगरपंचायत, बार्शिटाकळी जि. अकोला.**

**NAME CHANGE**
PASSPORT NO J8891973
FILE NO NGPZ05098511
***OLD NAME***
**MOHAMMAD NADEEM RANGARI**
***NEW NAME***
**MOHAMMAD NADEEM MOHAMMAD HANIF RANGARI**
**-- : ADDRESS :-**
ANJUMAN SCHOOL ROAD, RANGARI KIRANA SHOP, BALAPUR, DIST AKOLA MAHARASHTRA-444001

**FATHER NAME CHANGE**
PASSPORT NO J8891973
FILE NO NGPZ05098511
***OLD NAME***
**MOHAMMAD HANIF**
***NEW NAME***
**MOHAMMAD HANIF SABUDDIN RANGARI**
**-- : ADDRESS :-**
ANJUMAN SCHOOL ROAD, RANGARI KIRANA SHOP, BALAPUR, DIST AKOLA MAHARASHTRA- 444001

**MOTHER NAME CHANGE**
PASSPORT NO J8891973
FILE NO NGPZ05098511
***OLD NAME***
**NAZEMA BEGUM**
***NEW NAME***
**NAZEMA BEGUM MOHAMMAD HANIF RANGARI**
**-- : ADDRESS :-**
ANJUMAN SCHOOL ROAD, RANGARI KIRANA SHOP, BALAPUR, DIST AKOLA MAHARASHTRA- 444001

## निधन वार्ता



**काशिनाथ पाठक**

**अकोट :** पुंडा नंदीग्राम येथील शिव कृषी सेवा केंद्राचे संचालक शरद पाठक यांचे वडील काशिनाथ पाठक यांची राहत्या घरी अल्पशा आजाराने देवाज्ञा झाली आहे तरी आज ४.३० वाजता गावामधील स्मशान भूमीमध्ये अंत्यविधीचा कार्यक्रम पार पडणार आहे.

सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि. ३० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# दिशा समितीच्या बैठकीत आ. नितीन देशमुख आक्रमक

## चान्नी फाट्यावरील प्रस्तावित टोल नाका हटविण्याची मागणी; पारस रेल्वे अंडरपास प्रश्नावर तातडीने तोडगा काढण्याचे आदेश

प्रतिनिधी ३० मे

**पातूर :** जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण (दिशा) समितीची महत्त्वपूर्ण बैठक गुरुवार दि. २९ मे २०२६ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय अकोला येथे पार पडली. या बैठकीत विविध विकासकामांबाबत सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी माननीय आमदार श्री नितीन देशमुख यांनी बाळापुर मतदार संघातील नागरिकांच्या दैनंदिन समस्यांवर आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला धारेवर धरले.

शेगाव ते पातूर राष्ट्रीय महामार्गावरील चान्नी फाट्यावर प्रस्तावित टोल नाक्याचा मुद्दा बैठकीत चांगलाच गाजला. भविष्यात स्थानिक नागरिकांना टोलमुळे मोठा आर्थिक व मानसिक



त्रास सहन करावा लागणार असल्याचे सांगत आमदार नितीन देशमुख यांनी सदर टोल नाका इतरत्र स्थलांतरित करण्याबाबत प्रशासनाला स्पष्ट सूचना केल्या. 'स्थानिक जनतेच्या हिताशी तडजोड सहन केली जाणार नाही,' असा इशाराच त्यांनी यावेळी दिला.

तसेच मौजे पारस येथील रेल्वे अंडरपासमध्ये दर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प होते. त्यामुळे नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. या गंभीर समस्येची दखल घेत आमदार देशमुख यांनी संबंधित विभागाला तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे आदेश दिले.

बैठकीत ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यांच्या निकृष्ट देखभालीचाही मुद्दा जोरदारपणे उपस्थित करण्यात आला. अंतर्गत रस्त्यांच्या कामांनंतर पाच वर्षांपर्यंत देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची असते. मात्र अनेक ठिकाणी नियमांचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले. यावर संताप व्यक्त करत 'रस्त्यांची दुरुस्ती वेळेत झाली नाही तर संबंधित कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करा,' अशा कडक सूचना देण्यात आल्या.

घरकुल लाभार्थ्यांना मुरूम व रेतीची मोफत रॉयल्टी देण्याचा महत्त्वपूर्ण मुद्दाही बैठकीत चर्चिला गेला. अनेक गरीब लाभार्थ्यांना घरकुल उभारणी करताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांना दिलासा देण्यासाठी मोफत रॉयल्टी देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. चर्चा अंती अध्यक्षांनी संबंधित यंत्रणेला याबाबत आवश्यक सूचना दिल्या.

दरम्यान, विधवा महिलांना प्राधान्याने घरकुलाचा लाभ मिळावा या विषयावरही बैठकीत गंभीर चर्चा झाली. अनेक पात्र महिलांना योजनांपासून वंचित राहावे लागत असल्याची बाब समोर आल्यानंतर अध्यक्षांनी यावर कडक कार्यवाही करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

दिशा समितीच्या या बैठकीत विकासकामांच्या अंमलबजावणीतील त्रुटींवर जोरदार चर्चा झाली असून नागरिकांच्या प्रश्नांबाबत प्रशासन अधिक संवेदनशील होण्याची गरज असल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

# लोतखेडजवळील पूर्णानदीच्या पात्रातून रेतीचा जोरदार उपसा!



■ जेसीबीच्या सहाय्याने काढली जाते रेती
■ रेती माफीयांचा उघड-उघड दरोडा

प्रतिनिधी ३० मे

**अकोला :** जिल्ह्यातून लोतखेड जवळील पुर्णा नदीपात्रातून जेसीबीच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात रेतीचा उपसा सुरू आहे. रेतीची वाहने दिवस-रात्र म्हैसांग भागातून जात आहेत. म्हैसांग भागातून रात्रंदिवस बेकायदेशीर रेतीचे उत्खनन सुरू आहे. एक प्रकारे हा रेती रेती माफियांचा उघड-उघड दरोडा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र या सर्व प्रकाराकडे महसूल विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने सध्या हा विभाग गाढ झोपेत असल्याची चर्चा परिसरात रंगत आहे.

या रेती माफियांच्या अवाढव्य आणि ओव्हरलोड ट्रक वाहतुकीमुळे सामान्य जनतेचे जगणे असह्य झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, म्हैसांग येथील स्मशानभूमीसमोरील रस्ता, जो आधीच अत्यंत अरुंद होता, तो या अवजड ट्रकच्या वाहतुकीमुळे तब्बल दोन फूट खाली दबला आहे. स्मशानभूमीचा रस्ता पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. अंत्यसंस्कारासाठी जाणाऱ्या लोकांना व नातेवाईकांना आता या चिखलातून आणि खचलेल्या रस्त्यातून जावे लागत आहे. मृत्यूनंतरही माणसाला शांतता लाभू नये? इतकी दयनीय अवस्था या रेती माफियांनी करून ठेवली आहे. या रेती माफीयांकडूने बेधडकपणे निसर्गाची लूट सुरू आहे. गावकरी त्रस्त आहेत, रस्ते खराब झालेत, पण कारवाईच्या नावावर मात्र प्रशासनाचा आनंदी आनंद आहे! इथून रोज क्षमतेपेक्षा जास्त रेती भरून ट्रक धावत आहेत. नदीचे पात्र तर ओरबाडलेच, पण आता गावातील रस्ते आणि स्मशानभूमीच्या वाटाही यांनी सोडलेल्या नाहीत.

# शेतकऱ्यांनी पर्यायी खते वापरावी

प्रतिनिधी ३० मे

**अकोला :** डि ए पी खतांचा पुरवठा कमी होत असल्याने पर्यायी खताचा वापर करण्याचा सल्ला राज्यातील कृषी विभागाने दिला आहे. पाहू या नेमके कोणते पर्यायी खते खरीप हंगामासाठी आहेत.

राज्यामध्ये लवकरच पेरणीला सुरुवात होणार असून डिएपी खताची शेतक-यांकडून जास्त मागणी होणार आहे. डिएपी (डी अमोनिअम फॉस्फेट) खता मध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत. राज्यामध्ये डीएपी खताचा पुरवठा अपेक्षेप्रमाणे होत नाही त्यामुळे पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. टिएसपी या खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरीप हंगामामध्ये शेतक-यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खत्तांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून सर्व शेतकरी बांधवाना करण्यात येत आहे.

# टोपी बदलून दिला सामाजिक एकतेचा संदेश

## बाळापुरात सत्यपाल महाराजांच्या कीर्तनाला अलोट गर्दी !

प्रतिनिधी ३० मे

**बाळापूर :** सत्यशोधक समाजाचे संस्थापक आणि थोर विचारवंत क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी महोत्सवाचे औचित्य साधून बाळापूर येथे प्रबोधनात्मक कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र माळी युवक संघटना, बाळापूर शहर यांच्या वतीने २७ मे रोजी सायंकाळी बाळापूर येथील अकोला नाका येथील कार्यक्रमात प्रकाश तायडे यांनी विचार व्यक्त करतांना सांगितले कि आम्हाला अभिमान आहे आम्ही महात्मा फुले यांच्या वंशात जन्माला आलोय, आणि त्यांचे समतेचे नायाचे विचारांचा प्रसार आणि प्रचार



करण्याची जबाबदारी आपली आहे. म्हणून महाराष्ट्र माळी युवक संघटनेच्या माध्यमातून दरवर्षी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्यानंतर मुख्य प्रबोधनकार म्हणून प्रसिद्ध सप्तखंजिरी वादक, राष्ट्रीय प्रबोधनकार ह.भ.प. सत्यपाल महाराज यांनी आपल्या रोखठोक वाणीतून समाजप्रबोधन करत सामाजिक एकतेचा संदेश दिला. कीर्तनादरम्यान सत्यपाल महाराजांनी एका मुस्लिम बांधवाच्या डोक्यातील टोपी स्वतः परिधान केली आणि स्वतःच्या डोक्यातील भगवी टोपी त्या मुस्लिम बांधवाच्या डोक्यात घालून सामाजिक ऐक्याचे एक अनोखे उदाहरण जनतेसमोर ठेवले. आणि टोपी बदलल्यानेआपला धर्म बदलत नसल्याचे दाखवून दिले. या भव्य सोहळ्याचे अध्यक्षस्थान क्षत्रिय माळी परिषद बावीसगावचे अध्यक्ष गणेशराव आसोलकर यांनी भूषवले. तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र माळी युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे, अकोला मनपाचे माजी महापौर जयंतभाऊ मसने, ओबीसी नेते तथा उद्योजक प्रा. डॉ. संतोष हुशे, अकोला जिल्हा परिषदेचे माजी सभापती पंढरीशेठ हाडोळे, जि.प. सदस्य चंद्रशेखर चिंचोळकर, माजी शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुभाषचंद्र धनोकार आणि युवासेना प्रमुख दीपक बोचरे, सचिन धनोकार यांसह बाळापूर नगर परिषदचे उपाध्यक्ष सुरेंद्र धोपटे, डॉ. फैय्याज हुसैन, गटनेता मोहम्मद अकरम अनेक मान्यवर उपस्थित होते. संचालन व आभार प्रा. नितीन हुसे यांनी मानले.

# आता श्री संत एकनाथ महाराजांच्या दरबारात श्रींचा तीर्थक्षेत्रिय सप्ताह

प्रतिनिधी ३० मे

**अकोट :** आकोट श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, क्षेत्र श्रद्धासागर आकोट द्वारा प्रतिवर्षी एका तीर्थक्षेत्रावर श्री संत वासुदेव महाराज यांचा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह आयोजित केला जातो. यावर्षीचा तीर्थक्षेत्रिय सप्ताह श्री संत एकनाथ महाराज यांच्या दरबारात क्षेत्र पैठण येथे सुनियोजित आहे. मागील काही वर्षांमध्ये क्षेत्र सिंदी रेल्वे क्षेत्र त्र्यंबकेश्वर, क्षेत्र सासवड, क्षेत्र मुक्ताईनगर, क्षेत्र नेवासा, क्षेत्र देहू, क्षेत्र पिंपळनेर, इत्यादी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध तीर्थक्षेत्रांवर श्री संत वासुदेव महाराज यांचा तीर्थक्षेत्रिय सप्ताह भव्य दिव्य प्रमाणात पार पडलेला आहे. छ. संभाजीनगर जिल्ह्यातील श्री संत एकनाथ महाराज संस्थान, श्री क्षेत्र पैठण येथील सप्ताहात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह ३ ते १० जून दरम्यान संपन्न होणार आहे. सप्ताहामध्ये व्यासपीठ नेतृत्व ह.भ.प. अंबादास महाराज मानकर, तसेच दररोज सकाळी ११ वाजता श्री ज्ञानेश्वरी व श्री भावार्थ रामायण या ग्रंथांवर ह.भ.प. उमेश महाराज मोहोकार यांची प्रवचन सेवा संपन्न होणार आहे. ९ जून रोजी ज्ञानेश्वरी पारायण समाप्ती प्रसंगी ह.भ.प. वासुदेव महाराज महल्ले यांची प्रवचन सेवा होईल.

**१ जून रोजी श्रींचे प्रस्थान**
श्री क्षेत्र पैठण येथील सप्ताहाकरिता श्री संत वासुदेव महाराज यांचा पालखी-रथ, रजत मुखवटा, पादुका, चोपदार, टाळकरी, महाराज मंडळी, सेवाधारी, शिबिरार्थी विद्यार्थी, आदी संस्थेचे सर्व सेवाभावी मंडळी यांचे १ जून रोजी श्री क्षेत्र श्रध्दा सागर येथून दुपारी ४ वा. प्रस्थान होईल.

# आलेगावात ईद-उल-अजहा उत्साह आणि शांततेत साजरी



प्रतिनिधी ३० मे

**आलेगाव :** पातूर तालुक्यातील आलेगाव येथे ईद-उल-अजहाचा सण यंदाही पारंपरिक उत्साह, श्रद्धा आणि बंधुभावाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. ईदची नमाज अदा करण्यासाठी मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने ईदगाह आणि बदर मशिदीत एकत्र जमले होते.

ईदगाह येथे जामा मशिदीचे इमाम हाफिज जुबेर साहेब यांनी ईदची नमाज अदा करून खुतबा दिला. नमाजनंतर देशात अमन, शांतता आणि सुख-समृद्धीसाठी विशेष दुआ करण्यात आली.

तसेच बदर मशिदीत इमाम असद साहेब यांनी नमाजाचे नेतृत्व केले. त्यांनी खुतबा देत ईद-उल-अजहाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. नमाजनंतर देशात बंधुभाव, शांतता आणि प्रगतीसाठी प्रार्थना करण्यात आली.

या प्रसंगी पोलिस प्रशासनाकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. प्रशासनाच्या उपस्थितीत संपूर्ण कार्यक्रम शांततेत आणि सुरळीत पार पडला. ईदच्या निमित्ताने नागरिकांनी एकमेकांना मिठी मारून शुभेच्छा दिल्या आणि बंधुभावाचा संदेश दिला.

# वसतीगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

**अकोला :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह (आदर्श कॉलनी), अकोला येथील इयत्ता ८ वी ते वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी वसतिगृहातील रिक्त जागांनुसार प्रवेश अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, तसेच अनाथ, अपंग व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींसाठी ही सुविधा उपलब्ध असून, वसतीगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. पात्र व गरजू विद्यार्थिनींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन गृहपाल व्ही. बी. कुळकर्णी यांनी केले आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अधिकृत संकेतस्थळ सुरू केले असून अर्जदारांनी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज सादर करावा.

# आकोट येथे श्रीमद भागवत कथा सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी ३० मे

**आकोट :** श्री संत नरसिंग महाराज संस्थान व श्री संत नरसिंग महाराज झोपडी यांच्या संयुक्त विद्यमाने पवित्र अधिक मासानिमित्त श्रीमद भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा अधिक ज्येष्ठ-सोमवार, १ जून ते अधिक ज्येष्ठ-रविवार, ७ जून दरम्यान श्री संत नरसिंग महाराज मंदिर सभागृह येथे अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रसिद्ध कथा वाचक ह. भ. प. श्री कुंजबिहारी महाराज (कामरगाव) यांच्या वाणीतून होणारे श्रीमद भागवत कथामृत होय. दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळेत भागवत कथा होणार असून परिसरातील भाविकांना अध्यात्मिक मेजवानी



लाभणार आहे. तसेच समारोपीय काल्याचे कीर्तन सोमवार, ८ जून रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह. भ. प. श्री अशोक महाराज राजगुरु यांच्या उपस्थितीत होणार आहे. दैनंदिन कार्यक्रमात सायंकाळी ७ वाजता हरिपाठ तर रात्री ८ ते १० या वेळेत हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. कीर्तनकारांची नावे दररोज भागवत कथेदरम्यान जाहीर करण्यात येणार आहेत. याशिवाय विटाळी सावरगाव, वणी वारुळा तसेच नंदीपेठ आकोट येथील भजन मंडळेही या धार्मिक कार्यक्रमात सेवा देणार आहेत.

# मोरझाडीत ग्रामस्थांची सतर्कता, निकृष्ट कामाविरोधात एल्गार

■ तब्बल १ कोटी ४८ लाखांच्या सुमार रस्ते कामाची चौकशी करा
■ गावकरी व उपसरपंचांची जिल्हा परिषद प्रशासनाकडे मागणी

प्रतिनिधी ३० मे

**अकोला :** ग्रामीण भागातील विकास कामांमध्ये पारदर्शकता आणि गुणवत्ता राखण्यासाठी बाळापूर तालुक्यातील मोरझाडी येथील ग्रामस्थ आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी मोठी सतर्कता दाखवली आहे.

मोरझाडी ग्रामपंचायत अंतर्गत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मंजूर झालेल्या १ कोटी ४८ लाख निधीच्या डांबरीकरण रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप करत, या कामाची तात्काळ चौकशी करण्याची मागणी उपसरपंच दिलीप रवींद्र पाटील यांनी अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे एका



पत्राद्वारे केली आहे. ग्रामपंचायतीने घेतलेल्या या आक्रमक आणि जागरूक भूमिकेमुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. रस्त्याचे काम दिलेल्या एस्टिमेटनुसार किलोमीटरच्या निकषात आणि उत्तम गुणवत्तेचे होणे आवश्यक होते. मात्र, कंत्राटदाराकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे गावकऱ्यांच्या निदर्शनास आले. यावर तात्काळ पाऊल उचलत उपसरपंचांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, या कामाची आधी चौकशी व्हावी, त्यानंतरच कंत्राटदाराला बिल अदा केले जावे. चौकशी न करता पैसे दिल्यास मोरझाडीतील सर्व नागरिक जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करतील. सार्वजनिक निधीचा गैरवापर रोखण्यासाठी आणि आपल्या गावातील रस्ते दर्जेदार व्हावेत यासाठी मोरझाडी येथील नागरिकांनी घेतलेला हा पुढाकार इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

# फौजी फिजिकल अकॅडमीचा यशस्वी ठसा

## मूर्तिजापूरच्या दोन मुलींची पोलीस दलात निवड

प्रतिनिधी ३० मे

**मूर्तिजापूर :** येथील 'फौजी फिजिकल अकॅडमी'च्या उत्कृष्ट आणि दर्जेदार मार्गदर्शनाचा सुवर्णकलश पुन्हा एकदा झळकला आहे. अकॅडमीच्या दोन गुणवंत विद्यार्थिनींनी पोलीस भरतीत नेत्रदीपक यश संपादन करत पोलीस विभागात आपली जागा निश्चित केली आहे. अनुष्का कुर्मी रा. सिरसो, ता. मूर्तिजापूर आणि अपेक्षा मोहन इंगळे रा. शिवाजी नगर, मूर्तिजापूर अशी पोलीस दलात निवड झालेल्या रणरागिणींची नावे आहेत. या दैदिप्यमान यशामुळे संपूर्ण मूर्तिजापूर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून अकॅडमीवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



### १७ वर्षे देशसेवा आणि आता 'निशुल्क' कर्तव्य

१७ वर्षे भारतीय सैन्यात देशाची सेवा करून सेवानिवृत्त झालेले माजी सैनिक मंगेश घुगे यांनी मूर्तिजापूरमध्ये तरुण-तरुणींना सैन्यात व पोलीस दलात भरती होण्याची संधी मिळावी म्हणून 'फौजी फिजिकल अकॅडमी'ची स्थापना केली. विशेष म्हणजे, या अकॅडमीच्या माध्यमातून ते विद्यार्थ्यांना पूर्णपणे निशुल्क (मोफत) मार्गदर्शनकरतात.

### जिद्द आणि कठोर परिश्रमाचे फळ

अनुष्का आणि अपेक्षा यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, कठोर परिश्रम, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश खेचून आणले आहे. आपल्या यशाचे श्रेय देताना दोन्ही मुलींनी सांगितले की, पालकांचा पाठिंबा, शिक्षकांचे आशीर्वाद आणि मंगेश घुगे सरांचे अचूक मार्गदर्शन यामुळेच आज आम्ही खाकी वर्दी परिधान करण्याचे आमचे स्वप्न पूर्ण करू शकलो.

### भविष्यातील संकल्प आणि आवाहन

अकॅडमीच्या या यशामुळे फौजी फिजिकल अकॅडमीचा परिसरातील दबदबा आणखी वाढला आहे. भविष्यातही ग्रामीण व गरजू भागातील अधिकाधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना शासकीय सेवेत उच्च पदांवर पोहोचवण्याचा संकल्प अकॅडमीच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. ज्या तरुण-तरुणींना देशसेवा करायची आहे किंवा पोलीस दलात भरती व्हायचे आहे, त्यांनी कोणत्याही आर्थिक विवंचनेचा विचार न करता अकॅडमीमध्ये प्रवेश घ्यावा व आपल्या स्वप्नांना गवसणी घालावी, असे आवाहन माजी सैनिक मंगेश घुगे यांनी केले आहे. दोन्ही यशस्वी मुलींचे व फौजी अकॅडमीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा
इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

मॉं गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. ३० मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com




# राळेगावात तीन दुकाने जळून खाक

प्रतिनिधी ३० मे



**यवतमाळ :** राळेगाव शहरातील वडकी-राळेगाव मार्गावर रावेरीकडे जाणाऱ्या वळणाजवळ असलेल्या पंचर दुरुस्तीच्या दुकानाला शुक्रवारी दुपारी भीषण आग लागून तीन दुकाने जळून खाक झाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास ही आग लागली. पंचर दुरुस्तीच्या दुकानात मोठ्या प्रमाणात खराब टायर व ज्वलनशील साहित्य असल्याने आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. आगीच्या झळा शेजारील दोन दुकानांपर्यंत पोहोचल्याने ती दुकानेही जळून खाक झाली.

दुकानातील साहित्य पूर्णतः वितळून गेले असून, आत ठेवलेल्या सिलेंडरचाही स्फोट झाल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

दरम्यान, शेजारील थंड पेयाच्या दुकानालाही आगीची झळ पोहोचली. स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत दुकानाचे शटर उघडून आग विझविण्यास मदत केल्याने मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वडकीचे ठाणेदार अन्य कामानिमित्त राळेगावात आले असताना त्यांना धुराचे लोट दिसल्याने त्यांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला.

यानंतर अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. मात्र एकच फायर ब्रिगेड उपलब्ध असल्याने पाणी भरून परत येईपर्यंत आगीने पुन्हा जोर धरला.

जवळपास दीड ते पावणे दोन तासांच्या प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले.

शुक्रवारचा बाजार असल्याने परिसरात मोठी गर्दी होती. त्यामुळे काही काळ वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली होती. पोलिसांनी गर्दी हटवून परिस्थिती नियंत्रणात आणली. ग्रामस्थांनीही आग विझविण्यासाठी पुढाकार घेत अग्निशमन दलाला सहकार्य केले.

आगीचे नेमके कारण आणि झालेल्या नुकसानीचा आकडा रात्री उशिरापर्यंत स्पष्ट झाला नव्हता. परिसरात अन्य मोठी दुकाने नसल्याने मोठा अनर्थ टळल्याचे नागरिकांनी सांगितले. दुकानाच्या मागील बाजूस निवासी घर असूनही आग नियंत्रणात आणण्यात यश आल्याने संभाव्य दुर्घटना टळली.

# शेतकरी प्रश्नांवर शिवसेनेचे निवेदन; गजानन सुरोशे हत्या प्रकरणात कठोर कारवाईची मागणी

प्रतिनिधी ३० मे

**उमरखेड :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेच्या उमरखेड तालुक्याच्या वतीने शुक्रवारी (ता. २९) उपविभागीय अधिकारी मुळे यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री यांना विविध शेतकरी प्रश्नांसंदर्भात तसेच गोरक्षक गजानन सुरोशे हत्या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले.

निवेदनात शेतकऱ्यांच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे. शेती मशागतीसाठी डिझेल व पेट्रोल घेण्यासाठी प्रशासनाकडून वाहन आणण्याची अट घालण्यात येत असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे. ही अट रद्द करून शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार इंधन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

उमरखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना अद्याप पीकविमा मिळालेला नसल्याने तो तातडीने वितरित करावा, तसेच खत पुरवठ्यातील जोडणी पद्धत बंद करून मुबलक प्रमाणात खत उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांची ऑनलाइन हजेरी घेताना नेटवर्कच्या अडचणींमुळे शेतकरी व मजुरांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे ऑनलाइनऐवजी ऑफलाइन हजेरी प्रणाली सुरू करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

सुकळी येथे गोरक्षक गजानन सुरोशे यांची झालेली हत्या अत्यंत गंभीर असून, या प्रकरणातील आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करून त्यांना कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी सहसंपर्कप्रमुख बळीराम मुटकुळे, विधानसभा समन्वयक राजेश खामणेकर, तालुकाप्रमुख सतीश नाईक, तालुका सचिव संतोष जाधव, महागाव तालुकाप्रमुख रविंद्र भारती, उपतालुकाप्रमुख श्रीराम कदम, नागेश गोरेवाड, साहेबराव शिंदे, युवा सेनेचे जिल्हा समन्वयक संजय पळसकर, उपजिल्हाप्रमुख नितीन शिंदे, तालुका उपसंघटक दिगंबर सूर्यवंशी, देवानंद भारती यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# विहिरीत बुडून बाप-लेकाचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी ३० मे



**यवतमाळ :** घाटंजी तालुक्यातील रामनगर तांडा (घोटी) येथे विहिरीत बुडून बाप व मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

सचिन प्रेमसिंग जाधव (वय ३७) व त्याचा मुलगा विहान सचिन जाधव (वय ९) अशी मृतांची नावे आहेत. सचिन जाधव यांना दारूचे व्यसन असल्याची माहिती नातेवाईकांनी पोलिसांना दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सचिन जाधव हे गुरुवारी आपल्या दोन मुलांसह गावालगत असलेल्या एका शेतातील विहिरीवर पोहण्यासाठी गेले होते. यावेळी मोठा मुलगा विहान याच्यासह ते विहिरीत उतरले, तर लहान मुलगा सार्थक व अन्य एक मुलगा विहिरीच्या काठावर थांबले होते. पोहत असताना अचानक सचिन व विहान हे पाण्याखाली गेले आणि वर आले नाहीत.

ही बाब लक्षात येताच लहान मुलगा सार्थक याने धावत जाऊन घरच्यांना माहिती दिली. ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत पोलिसांना कळविले. पारवा पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून ग्रामस्थांच्या मदतीने दोघांना बाहेर काढत घाटंजी येथील ग्रामीण रुग्णालयात हलविले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.

या प्रकरणी सुभाष बळीराम जाधव यांनी पारवा पोलिस ठाण्यात जबानी रिपोर्ट दिला असून, घटनेबाबत कोणावरही संशय नसल्याचे नमूद केले आहे. दारूच्या नशेत पोहताना नियंत्रण सुटल्याने ही दुर्घटना घडली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेचा पुढील तपास पारवा पोलीस करीत आहेत.

# देशी दारूसह मोपेड जप्त; एकावर गुन्हा

प्रतिनिधी ३० मे



**आर्णी :** पहूर परिसरात अवैधरित्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या एका इसमावर पोलिसांनी कारवाई करत दारूसह मोपेड वाहन जप्त केले. ही कारवाई शुक्रवारी करण्यात आली.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, एक इसम बोरगाव येथून मोपेड वाहनावर देशी दारूच्या पेट्या घेऊन पहूर-नस्करी मार्गाने येत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक रवींद्र जाधव, जमादार सतीश चौधर, पोलीस अंमलदार राम ढाकणे व विशाल जाधव यांनी खाजगी वाहनाने पहूर गावाबाहेरील रस्त्यावर सापळा रचला. दरम्यान, संशयित इसम मोपेडवर दोन देशी दारूच्या पेट्या घेऊन जाताना दिसताच पोलिसांनी त्याचा पाठलाग केला. पहूर गावातील शिरसकर यांच्या घराजवळ सार्वजनिक रस्त्यावर त्याला अडवून चौकशी केली असता त्याने आपले नाव कुणाल पांडुरंग कावळे (वय ४१, रा. पहूर, ता. जि. यवतमाळ) असे सांगितले. त्याच्याकडील देशी दारूबाबत परवाना विचारला असता तो परवाना सादर करू शकला नाही. पोलिसांनी दोन पेट्यांमधील प्रत्येकी ४८ प्रमाणे एकूण ९६ देशी दारूचे पव्वे, किंमत ७ हजार ६८० रुपये, तसेच एमएच २९ सीजेएफ ०९९१ क्रमांकाची टीव्हीएस मोपेड, किंमत अंदाजे १ लाख रुपये असा एकूण १ लाख ७ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त केला. ही कारवाई ठाणेदार निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रवींद्र जाधव, जमादार सतीश चौधर, रायटर राम ढाकणे व विशाल जाधव यांनी केली.

# उमरगाव (पोड) वासियांची पाण्यासाठी भटकंती; भीषण पाणीटंचाईमुळे नागरिक हैराण

प्रतिनिधी ३० मे



**कळंब :** तालुक्यातील उमरगाव (पोड) येथील नागरिकांना गेल्या महिनाभरापासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. नळयोजनेच्या विहिरी कोरड्या पडल्याने बेलोरी व उमरगाव (पोड) परिसरात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. सुमारे 250 लोकवस्ती असलेल्या या गावात मोठ्या प्रमाणात आदिवासी बांधव वास्तव्यास आहेत. ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप बेलोरी व उमरगाव (पोड) येथील ग्रामस्थांनी केला आहे. गांधीनगर, बेलोरी आणि उमरपोड या तीन गावांचा गट ग्रामपंचायतीत समावेश आहे. बेलोरी आणि उमरपोड गावांच्या दरम्यान असलेला पाझर तलाव यावर्षी लवकर आटल्याने परिसरातील विहिरींना पाझर मिळणे बंद झाले आहे. तसेच, तलावातील पाण्याचा शेतकऱ्यांनी मोटारपंपांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर सिंचनासाठी वापर केल्याने पाणीपुरवठ्याच्या विहिरी आणि हातपंप कोरडे पडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. उमरगाव (पोड) येथे केवळ एकच हातपंप असून त्यालाही पुरेसे पाणी येत नसल्याने नागरिकांना दोन ते अडीच किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत घरगुती वापर, धुणी-भांडी तसेच जनावरांसाठी पाण्याची गरज वाढली असताना उपलब्ध पाण्याचा तुटवडा नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे.

दरम्यान, एवढी गंभीर पाणीटंचाई असतानाही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. बेलोरी व उमरपोड येथील नागरिकांनी तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासह कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

# एमएलसी निवडणुकीत मतांचा बाजार?

## लाखोंच्या चर्चांनी राजकीय वातावरण तापले

प्रतिनिधी ३० मे

**उमरखेड :** विधानपरिषदेच्या प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होताच जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असून उमरखेड शहरात मात्र वेगळीच चर्चा रंगू लागली आहे. काँग्रेसकडून साहेबराव कांबळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा आहे, तर भाजपाकडून नितीन भुतडा यांचे नाव आघाडीवर मानले जात आहे. शिवसेनेलाही उमेदवारी मिळण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने निवडणूक रंगतदार होण्याची चिन्हे दिसत आहेत.

जिल्ह्यात एकूण ४४६ मतदार असून त्यात नगरपरिषद व नगरपंचायतीतील निवडून आलेले सदस्य आणि स्वीकृत नगरसेवकांचा समावेश आहे. उमरखेड नगरपरिषदेत ३० सदस्य असल्याने येथील प्रत्येक मताला मोठे राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र निवडणुकीपेक्षा शहरात सध्या एका वेगळ्याच चर्चेने खळबळ उडवली आहे.

शहरातील चौकाचौकात "एका मतासाठी १५ ते २० लाख रुपये मिळणार" अशा चर्चा रंगत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. निवडून दिलेले नगरसेवक विकासासाठी की मतांचा सौदा करण्यासाठी, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

उमरखेड शहरात नालीसफाई, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि स्वच्छतेच्या समस्या गंभीर बनल्या आहेत. अनेक वार्डांमध्ये नागरिक त्रस्त असून, निवडून आलेले काही नगरसेवक वार्डात फिरकत नसल्याचीही नाराजी व्यक्त केली जात आहे.

विकासकामांचा पाठपुरावा करण्याऐवजी "कोणत्या कामातून किती कमिशन?" आणि "कोणाकडून किती फायदा?" यावरच नगरपरिषदेत चर्चा होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. तसेच काही लोकप्रतिनिधींकडून अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे, दादागिरी करणे आणि कर्मचाऱ्यांना धमकावण्याचे प्रकार वाढल्याचीही चर्चा शहरात सुरू आहे.

"ज्या जनतेच्या मतांवर निवडून आलात, त्याच जनतेला विसरून आता मतांचा बाजार मांडणार का?" असा थेट सवाल आता नागरिक नगरसेवकांना विचारत आहेत. एमएलसी निवडणुकीच्या निमित्ताने उमरखेडमध्ये सुरू असलेल्या या चर्चांमुळे स्थानिक राजकारणातील वास्तव पुन्हा एकदा समोर आले असून, नागरिक आता आश्वासनांपेक्षा प्रामाणिक कामाची अपेक्षा व्यक्त करत आहेत.

# आर्णीत ६० किलो गोमांस जप्त

प्रतिनिधी ३० मे

**आर्णी :** अरुणावती नदीकाठी असलेल्या शेतात सुरू असलेल्या गोहत्येचा प्रकार आर्णी पोलिसांनी उघडकीस आणत ६० किलो गोमांसासह कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना शुक्रवारी (ता. २९) सकाळी अकराच्या सुमारास गोपनीय माहिती मिळाली की, कोलवन-कुऱ्हा आंतरगाव रस्त्यालगतच्या एका शेतात जनावरांची कत्तल सुरू आहे. माहिती मिळताच पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना पाहताच पत्र्याच्या शेडमधून दोन जण पळून गेले. शेतात उपस्थित असलेल्या मुबारक रज्झाक मलानस (वय ६५) यांची चौकशी केली असता, त्यांनी नासिर शाहमस्तान शाह (वय ५०, रा. पोलीस ठाण्यामागे, आर्णी) आणि शेख गफूर शेख रसूल (वय ३५, रा. मोमिनपुरा) हे गोहत्या करत असल्याचे सांगितले. कॉन्स्टेबल आकाश गावंडे यांच्या तक्रारीवरून आर्णी पोलीस ठाण्यात संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्याअंतर्गत तसेच भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ठाणेदार निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

- पंचांसमक्ष करण्यात आलेल्या तपासणीत घटनास्थळावरून १२ हजार रुपये किमतीचे ६० किलो गोमांस, तसेच कत्तलीसाठी वापरण्यात आलेले दोन चाकू व लोखंडी कुऱ्हाड असा एक हजार रुपयांचा साहित्य जप्त करण्यात आले. एकूण १३ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

# दिग्रसला 'शिवछत्रपती' कबड्डी स्पर्धेचे यजमानपद मिळावे : मंत्री संजय राठोड यांची मागणी

प्रतिनिधी ३० मे



**दिग्रस :** यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथे राज्यस्तरीय 'शिवछत्रपती कबड्डी स्पर्धा' आयोजित करण्यात याव्यात, अशी मागणी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी २५ मे २०२६ रोजी सविस्तर पत्र पाठवून दिग्रस तालुक्याची क्रीडा परंपरा, कबड्डीप्रेमी वातावरण आणि उपलब्ध पायाभूत सुविधांची माहिती दिली आहे.

पत्रात मंत्री राठोड यांनी नमूद केले आहे की, कबड्डी हा महाराष्ट्राच्या मातीत रुजलेला ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य खेळ असून ग्रामीण युवकांमध्ये या खेळाबाबत विशेष आकर्षण आहे. राज्यस्तरीय स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध होते आणि नवोदितांना प्रोत्साहन मिळते.

दिग्रस शहर व तालुक्याला कबड्डीची समृद्ध परंपरा लाभली असून येथील अनेक खेळाडूंनी जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ग्रामीण व आदिवासीबहुल भागातील युवकांमध्ये कबड्डीबाबत मोठी आवड असून योग्य संधी मिळाल्यास येथील खेळाडू राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करू शकतात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

स्पर्धा आयोजनासाठी आवश्यक विस्तीर्ण क्रीडांगण, खेळाडू व अधिकाऱ्यांसाठी निवास व्यवस्था, वाहतूक आणि वैद्यकीय सुविधा, स्वयंसेवकांची उपलब्धता तसेच स्थानिक प्रशासन, क्रीडा संस्था आणि सामाजिक संघटनांचे सहकार्य दिग्रस येथे सहज उपलब्ध होऊ शकते, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या समन्वयातून ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्याची तयारी असल्याचे मंत्री राठोड यांनी स्पष्ट केले.

राज्यस्तरीय 'शिवछत्रपती कबड्डी स्पर्धा' दिग्रस येथे झाल्यास यवतमाळ जिल्ह्यासह विदर्भातील ग्रामीण व आदिवासी भागातील खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळेल. यामुळे स्थानिक क्रीडा संस्कृतीला चालना मिळण्याबरोबरच क्रीडा पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही फायदा होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

ग्रामीण भागातील क्रीडा प्रतिभेला संधी देण्यासाठी आणि विदर्भातील खेळाडूंना राज्यस्तरीय व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'शिवछत्रपती' राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा दिग्रस येथे आयोजित करण्यास मान्यता द्यावी, अशी विनंती मंत्री संजय राठोड यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे.

# विनापरवाना रेती वाहतूक; दोन ट्रक जप्त

प्रतिनिधी ३० मे




**कळंब :** जिल्हा खनिकर्म विभागाने शुक्रवारी सकाळी कळंब-यवतमाळ मार्गावरील चापर्डा गावाजवळ केलेल्या कारवाईत विनापरवाना रेती वाहतूक करणारे दोन ट्रक जप्त केले. या कारवाईमुळे अवैध रेती वाहतुकीविरोधातील प्रशासनाच्या मोहिमेला वेग मिळाला आहे.

जिल्हा खनिकर्म विभागाचे सहाय्यक खनिकर्म अधिकारी अपराजित यांच्या नेतृत्वाखालील पथक सकाळी साडेआठच्या सुमारास गस्त घालत असताना चापर्डा गावाजवळ दोन संशयित ट्रकांची तपासणी करण्यात आली. एमएच-४० सीझेड-८५५७ आणि एमएच-४० सीटी-०००९ या क्रमांकाच्या वाहनांमध्ये प्रत्येकी सुमारे आठ ब्रास रेतीची वाहतूक होत असल्याचे आढळून आले. तपासणीदरम्यान वाहनचालकांकडे रेती वाहतुकीसाठी आवश्यक असलेले वैध परवाने किंवा रॉयल्टी पास नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर खनिकर्म विभागाने दोन्ही वाहने जप्त करून कळंब तहसील कार्यालयात जमा केली. राळेगाव तालुक्यातील विविध घाटांमधून सध्या मोठ्या प्रमाणावर रेती उपसा सुरू असल्याची चर्चा आहे. पावसाळा जवळ आल्याने काही रेती तस्करांकडून रेतीचा साठा करून नंतर अधिक दराने विक्री केली जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. कळंब-यवतमाळ मार्गावर रेतीने भरलेल्या जड वाहनांची सातत्याने वर्दळ दिसत असतानाही तपासणी यंत्रणा अपेक्षित प्रमाणात सक्रिय नसल्याबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, चापर्डा येथील ग्राम महसूल अधिकारी राजेश चौधरी यांच्या तक्रारीवरून संबंधित वाहनांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती प्रशासनाने दिली. खनिकर्म विभागाच्या या कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. ३० मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## आचारसंहितेमुळे जून महिन्यातील विभागीय व महिला लोकशाही दिन रद्द

**अमरावती:** महाराष्ट्र विधान परिषदेच्या १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक-२०२६ ची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे, आगामी जून २०२६ महिन्यातील 'विभागीय लोकशाही दिन' आणि 'महिला विभागीय लोकशाही दिन' आयोजित करण्यात येणार नाही, अशी माहिती विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या शासन परिपत्रकानुसार दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय लोकशाही दिन, तसेच महिला विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन केले जाते. या दिवशी नागरिक व महिला आपल्या तक्रारी व समस्या थेट प्रशासनासमोर मांडतात. परंतु, भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्या १८ मे २०२६ च्या प्रसिद्धीपत्रकानुसार सध्या राज्यात निवडणूक आचारसंहिता लागू आहे. शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, ज्या क्षेत्रांमध्ये निवडणुकीची आचारसंहिता लागू असते, त्या ठिकाणी त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करता येत नाही.

# वादळासह अवकाळी पावसाचा महावितरणला मोठा फटका

### ♦ ११ व ३३ केव्ही वाहिन्यांचे पोल पडल्याने अनेक भागांचा वीजपुरवठा खंडित ♦ तीन एजन्सीसह महावितरणच्या शेकडो कर्मचाऱ्यांचे युद्धपातळीवर दुरुस्ती कार्य सुरू

प्रतिनिधी ३० मे

**अमरावती:** अमरावती शहरासह ग्रामीण भागात गुरुवारी दुपारनंतर आलेल्या वादळ, गारपीट आणि अवकाळी पावसामुळे महावितरणच्या वीज यंत्रणेला मोठा फटका बसला असून अनेक ठिकाणी वीज खांब कोसळल्याने तसेच वीज वाहिन्या तुटल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. विशेषतः भातकुली तालुक्यात सर्वाधिक नुकसान झाले आहे. महावितरणचे युध्द पातळीवर दुरूस्ती कार्य सुरू असून या काळात वीज ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे यांनी केले आहे.

गारा आणि वादळाच्या तडाख्यामुळे लघुदाब वाहिन्यांसह ११ केव्ही व ३३ केव्ही वीजवाहिन्यांचे खांब पडल्याने वलगाव, टाकरखेडा संभू, खार तळेगाव, भातकुली तसेच बडनेरा परिसरातील अनेक गावांचा वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे.




काही ठिकाणी वीजवाहिन्या तुटल्याने सुरक्षेच्या कारणास्तव वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे.

महावितरणच्या प्राथमिक माहितीनुसार, ३३ केव्ही अकोली फिडरसह ११ केव्ही सायत, निंभा, भातकुली, गणोजादेवी, सोलर भातकुली आणि आसरा फिडरवरील वीज खांब व वाहिन्यांचे नुकसान झाले असून महावितरणचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणच्या शेकडो कर्मचाऱ्यांसह तीन कंत्राटदार एजन्सी युद्धपातळीवर कार्यरत आहेत. रात्रीच्या अंधारामुळे पेट्रोलिंग आणि दुरुस्ती कार्यात अडथळे निर्माण होत असले तरी टप्प्याटप्प्याने वीजपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मुख्य अभियंता अशोक साळुंके आणि अधीक्षक अभियंता दिपक देवहाते संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, वीज ग्राहकांनी या काळात संयम व सहकार्य करावे, असे आवाहन कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे यांनी केले आहे.

## अमरावतीत हातभट्टीची दारू जप्त



प्रतिनिधी ३० मे

**अमरावती :** दिनांक २९.०५.२०२६ रोजी ०५.०० ते ०८.०० या वेळेत फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील राजुरा पारधी बेढा, वडाळी, परिहारपुरा तसेच नांदगाव पेठ पोलीस स्टेशन हद्दीतील शेंदोळा या ठिकाणी गुन्हे शाखेच्या ०५ अधिकारी व ३८ अंमलदार तसेच आरसीपी प्लाटूनचे ११ अंमलदारासहङरेड केली असता सुमारे ८३० लिटर दारू (किंमत अंदाजे ८३,०००/) व ३८७० लिटर सडवा ( किंमत अंदाजे १,९३,५००/) एकूण २,७६,५००/ञ् मिळून आला आहे. सॅम्पल घेऊन दारू व सडवा जागेवर नष्ट केला आहे. फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन तसेच नांदगाव पेठ पोलीस स्टेशन येथे एकूण ०८ गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण व त्यांचे टीमने केली आहे.

## पोलीस आयुक्तांच्या हस्ते सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरव

प्रतिनिधी ३० मे

**अमरावती :** पोलीस आयुक्तालय अमरावती शहर आस्थापनेवरील नियत वयोमानानुसार दिनांक ३१.०५.२०२६ रोजी ।) उइएघ/८९५ ज्ञानेश्वर चौरे ने मुख्यालय, ँएघ/२७७ प्रमोद गुळदे ने पो.स्टे. बडनेरा, ँएघ/ ८०४ महेंद्रसिंग येवतीकर ने. गुन्हे शाखा, चालक ण्/१६६७ अकबर ठुसैन जाफर हुसैन ने. मोपवि सेवानिवृत्त होणारे अधिकारी अंलमदार यांचा निरोप समारंभ कार्यक्रम आज दिनांक २९.०५.२०२६ रोजी पोलीस आयुक्त यांचे दालनात आयोजित करण्यात आला.

पोलीस आयुक्त . राकेश ओला यांचे हस्ते पोलीस महासंचालक यांचे शुभेच्छापत्र व



सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पेंशन ऑर्डर, सेवानिवृत्ती प्रमाणपत्र, सेवा नि. अंमलदार यांचे पत्नीस साडी व कुंडीतील रोपटे देवुन कौटुंबिक वातावरणात सत्कार करण्यात आला.

सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे अनुभवाचा लाभ भविष्यातही पोलीस विभागास मिळत राहणार अशी अपेक्षा व्यक्त करुन त्यांचे पुढील भविष्यात सुदृढ आरोग्यकरिता कुटुंबप्रमुख या नात्याने मा. पोलीस आयुक्त यांनी शुभेच्छा दिल्या व निवृत्तीनंतर मिळणारे पैशांची गुंतवणुकीपुर्वी विश्वासार्हता तपासुनच नियोजन करावे. तसेच सेवानिवृत्ती काळात त्यांचे शासकीय सुविधेबाबत काही अडचण असल्यास संपर्क करणेबाबत सुचीत केले.

तसेच पोलीस आयुक्तालय आस्थापनेवरील पोलीस हवालदार ते सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर पदोन्नत झालेले ४ पोलीस अंमलदार व पोलीस नाईक ते पोलीस हवालदार या पदावर झालेले ३ अंमलदार यांचा पदोन्नत समारंभ (झ्ज्ज्ह मीस्दहब्) कुटुंबियासोबत साजरा करण्यात आला. मा. पोलीस आयुक्त यांनी पुढील वाढलेल्या जबाबदारीची जाणीव करुन दिली व कर्तव्याला प्राधान्य देवुन कनिष्ठांना मार्गदर्शन करण्याविषयी सल्ला देवुन, पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाकरिता शाम घुगे पोलीस उपायुक्त परि-०२, रमेश धुमाळ पोलीस उपायुक्त मुख्यालय, निलेश करे, पोलीस निरीश्रक कल्याण शाखा. आरती आठवले, कार्यालय अधिक्षक तसेच सेवानिवृत्त झालेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कुटुंबिय व अन्य पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

## माजी सैनिकांचे व विधवा महिलांचे घरे पडू नये

### वंचित बहुजन आघाडी व शिवसेना शिंदे गटाची नगरपालिकांचे मुख्याधिकाऱ्यांकडे धाव



प्रतिनिधी ३० मे

**दर्यापूर :** सैनिक कॉलनी मध्ये नगरपालिकेच्या वतीने अतिक्रमण काढण्याची कारवाई सुरू आहे. याची धास्ती अतिक्रमणधारकांनी घेतली असून माजी सैनिकांचे व विधवा महिलांचे घरे पाडू नये , या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीचे नेते व शिवसेना शिंदे गट यांच्या नेत्यांनी तसेच सैनिक कॉलनी येथील अतिक्रमणधारकांनी मुख्याधिकारी डॉक्टर विकास खंडारे यांच्याकडे धाव घेतली आहे. त्यांच्याशी चर्चा करून त्यांना निवेदन दिले व अतिक्रमण काढू नये या संदर्भात विनंती करण्यात आलेली आहे.

काही दिवसातच पावसाळा लागत असल्याने नियमानुसार तशी ही कारवाई करता येत नाही असे विजय चोरपगार म्हणाले , तर माजी सैनिकांचा विचार करून त्यांना दिलासा द्यावा असे शिवसेना शिंदे गटाचे नेते गोपाल अरबट म्हणाले, माजी सैनिकांनी देशासाठी कार्य केले आहे. त्याचा विचार करून तरी कारवाई करू नये असे वंचित बहुजन आघाडीचे नेते विजय चोर पगार म्हणाले.

या ठिकाणी आंदोलन चिघडू नये म्हणून व कायदा व सुव्यवस्था राहावी म्हणून दर्यापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुनील वानखडे यांनी आपल्या पोलीस ताफ्यासह पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

यावेळी कॅप्टन कमलेश्वर दाभाडे, कॅप्टन रमेश तराळे, अनंत डगवार, गजानन धानोरकर, सुभेदार मनोहर सरदार, सविता इंगळे, बबीता डोंगरदिवे, उषा लवाळे, बेबी वाकपांजर, पुरुषोत्तम माहुरे, नेहल भटकर, चंदू रायबोले, वंचित बहुजन आघाडीचे महासचिव साहेबराव वाकपांजर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## वडाळी परिसरात कमी-जास्त व्होल्टेजमुळे नागरिक हैराण

### व्होल्टेजच्या समस्येमुळे घरातील विद्युत उपकरणांचे नुकसान

प्रतिनिधी ३० मे

**अमरावती :** शहरातील वडाळी परिसरातील भोईपुरा आणि मीनाताई ठाकरे शाळा परिसरात मागील काही दिवसांपासून वीज पुरवठ्यात सतत कमी-जास्त व्होल्टेजचा त्रास होत आहे. या समस्येमुळे परिसरातील नागरिक मोठ्या



प्रमाणात त्रस्त झाले असून अनेक घरांमधील टीव्ही, फ्रिज, ए.सी., पंखे आणि इतर विद्युत उपकरणे जळून बंद पडल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.

प्रभागाच्या नगरसेविका पंचफुला चव्हाण यांच्या नेतृत्वात परिसरातील रहिवाशांनी महावितरण प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. संबंधित भागात तांत्रिक तपासणी करून वीज पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच भविष्यात मोठी दुर्घटना टाळण्यासाठी नवीन डी.पी. बसवून सर्व विद्युत खांबांवर योग्य प्रकारे तीन फेज वीजवाहिनी जोडण्याची मागणीही नागरिकांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि हिताचा विचार करून प्रशासनाने या समस्येची तातडीने पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी परिसरातील रहिवाशांकडून करण्यात येत आहे.

## पी. एम. किसान योजना: लाभार्थ्यांनी ३० जूनपूर्वी ई-केवायसी पूर्ण करणे बंधनकारक

### कृषी विभागाचे आवाहन

प्रतिनिधी ३० मे

**अमरावती:** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी.एम. किसान) योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व पात्र लाभार्थ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाने चालू वर्ष २०२५-२६ करिता वार्षिक ई-केवायसी (I-ख्ण्) प्रमाणिकरण पूर्ण करणे बंधनकारक केले आहे. योजनेतील पारदर्शकता वाढवणे, गळती रोखणे आणि केवळ खऱ्या व जीवंत शेतकऱ्यांपर्यंतच लाभ पोहोचवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असून, राज्यात २० मे २०२६ पासून यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांनी ३० जून २०२६ पूर्वी आपली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करणे अनिवार्य आहे; अन्यथा विहित मुदतीत प्रक्रिया न केल्यास शेतकरी आगामी हप्त्यांच्या लाभापासून वंचित राहू शकतात.

शेतकऱ्यांना नजीकच्या सामाईक सुविधा केंद्रावर जाऊन बायोमेट्रिक प्रमाणीकरणाद्वारे किंवा 'इश्-ख्र्ईं' मोबाईल अॅप डाऊनलोड करून स्वतःच्या चेहऱ्याद्वारे (ईर्मेंलूपहूर्ग्मेदह) अशा दोन सोप्या पद्धतींपैकी कोणत्याही एका पद्धतीने आपले प्रमाणिकरण पूर्ण करता येईल. ज्या वृद्ध किंवा आजारी लाभार्थ्यांना हालचालीसंबंधी अडचणी आहेत आणि केंद्रावर जाणे शक्य नाही, त्यांच्यासाठी गाव पातळीवरील ग्रामस्तरीय नोडल अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी वैयक्तिकरीत्या लक्ष देऊन 'फेस ऑथेंटिकेशन'द्वारे ई-केवायसी पूर्ण करण्यास मदत करणार आहेत. या योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबाला दरवर्षी ६ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. २४ फेब्रुवारी २०१९ पासून सुरू झालेल्या या योजनेचा २० वा हप्ता २ ऑगस्ट २०२५ रोजी देण्यात आला होता.

दरम्यान, केंद्र शासनाने संशयित प्रकरणातील शेतकऱ्यांचा हप्ता तात्पुरता स्थगित केला आहे. प्रामुख्याने फेब्रुवारी २०१९ नंतर झालेले भूमी हस्तांतरण (खरेदी/बक्षीसपत्र/जमीन मंजुरी), चालू व मागील जमीन मालकाचा संशयास्पद अहवाल आणि मागील जमीन मालकाचा अपूर्ण अहवाल या तीन कारणांमुळे ज्यांचे हप्ते थांबले आहेत, अशा शेतकऱ्यांनी नजीकच्या सीएससी सेंटरला भेट देऊन पी. एम. किसान पोर्टलवरील ईंसे' ण्देही मधील ठळ्र्जें शेग्गेहु घ्र्देर्ईेंदहठ या ऊँ मधून आपली माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे.

## मेलोडी वाटप करत काँग्रेसचा इंधन दरवाढीविरोधात अनोखा एल्गार

### दर्यापूरात काँग्रेसचे जोरदार आंदोलन; तहसीलदारांना निवेदन सादर

प्रतिनिधी ३० मे

**दर्यापूर :** केंद्र व राज्य शासनाच्या जनविरोधी धोरणांचा निषेध करत वाढती महागाई, पेट्रोल, डिझेल, सीएनजी व इंधन दरवाढीविरोधात दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवारी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पेट्रोल पंपावर अनोख्या पद्धतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी नागरिकांना 'मेलोडी' चॉकलेट वाटप करून केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांचा निषेध नोंदविण्यात आला.

आंदोलनानंतर तहसीलदार यांना विविध मागण्यांचे निवेदनही सादर करण्यात आले. याप्रसंगी तहसीलदारांनाही मेलोडी चॉकलेट देण्यात आले.

या आंदोलनाला अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच सहकार नेते अॅड. श्रीरंग पाटील अरबट, माजी नगराध्यक्ष विक्रमसिंह परिहार, आत्मा कमिटीचे अध्यक्ष संजय भाऊ बेलोकार, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल पाटील गावंडे, पंचायत समितीचे माजी सभापती प्रदीप बाप्पू देशमुख, महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा श्रीमती कांचनमालाताई गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील वढाळ, काँग्रेस पक्षाचे



शहराध्यक्ष अतिष भाऊ शिरभाते, काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे जिल्हा महासचिव सयद राजिक भाई, खरेदी विक्री संघाचे संचालक दिनकरराव गायगोले, बाजार समितीचे संचालक भारत भाऊ आठवले, बाजार समितीचे संचालक असिफ भाई खान, अजित भाऊ देशमुख, संजय चव्हाण, दिनकरराव देशमुख, दिवाकरराव देशमुख, खरेदी विक्री संघाचे संचालक बाळासाहेब टोळे, संचालक राजेंद्र नागपुरे, संचालक प्रशांतराव देशमुख, सुभाष पाटील गावंडे, डॉ अविनाश ठाकरे, युवक काँग्रेसचे प्रदेश महासचिव नितेश भाऊ वानखडे, नानासाहेब धाबे, युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सागर देशमुख, माजी नगरसेवक पप्पू पाटील होले, अस्लम भाई मन्सूरी, सय्यद नदीम, अस्लम घाणीवले, जावेद शहा, शेख आदिल, सय्यद जुबेर, शेख रहमान, शेख आरिफ, विशालराव देशमुख, माजी नगरसेवक शिवाजीराव देशमुख, दादाभाऊ इंगळे, सचिन भाऊ टोळे, पप्पू पाटील टिंगरे, मंगल बुंदीले, नंदू शेठ लढा, श्रीजित ठाकरे, सुरेंद्र भाऊ कडू, जगदीश कंबे, ऋषीकेश काळे, सुनील डोंगरदिवे, साहेबराव गावंडे, राजकुमार खाडे, राहुल खडे, विनोद सदनाशिव यांच्यासह काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाढत्या इंधन दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले असून महागाईमुळे जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत. केंद्र व राज्य शासनाने इंधनावरील कर कमी करून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## मान्सून काळातील आपत्कालीन परिस्थितीसाठी विभागात २४ तास नियंत्रण कक्ष सज्ज

### आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा

प्रतिनिधी ३० मे

**अमरावती:** अमरावती विभागामध्ये मान्सूनच्या कालावधीत निर्माण होणाऱ्या संभाव्य आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे. मान्सूनच्या काळात अतिवृष्टी, पूर किंवा अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे नागरिकांना तातडीने मदत मिळावी या उद्देशाने विभागीय आयुक्त कार्यालयासह विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये (अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिय) 'आपत्कालीन नियंत्रण कक्ष' (सींहम्ब् ण्दहूदत् ँददसे) स्थापन करण्यात आले आहेत. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी मदतीसाठी प्रशासनाने जारी केलेल्या अधिकृत दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

शासनाच्या विशेष निर्देशानुसार, हे सर्व आपत्कालीन नियंत्रण कक्ष २४ तास आणि ३६५ दिवस अविरतपणे सुरू ठेवण्यात येणार आहेत. जेणेकरून कोणत्याही क्षणी नागरिकांना तातडीची मदत, बचावकार्य आणि योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे प्रशासनाला शक्य होईल.

## सिंधी चित्रपट 'गहेरो आ इश्क' २९ मे रोजी अमरावतीच्या मिराज सिनेमात प्रदर्शित

प्रतिनिधी ३० मे

**अमरावती :** सिंधी चित्रपटसृष्टीला एक नवी ओळख देणारा, बहुप्रतिक्षित कौटुंबिक रोमँटिक चित्रपट ठगहेरो आ इश्कठ २९ मे, २०२६ रोजी अमरावतीच्या मिराज सिनेमात भव्य प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. अमरावतीमधील प्रदर्शनानंतर, हा चित्रपट टप्प्याटप्प्याने इतर शहरांमध्ये आणि परदेशात प्रदर्शित केला जाईल. या चित्रपटाचे दिग्दर्शन तरुण दिग्दर्शक सागर सुरेश उदासी यांनी केले असून,



लक्ष्मण आहुजा, पूजा आर. मेघानी आणि सागर सुरेश उदासी यांनी निर्मिती केली आहे. या चित्रपटात रोहित मेघानी, श्यामा राज (मुंबई), अक्षय कर्नानी, रितेश मेहता, सोना गाडरे, रेणुका लोधम, गुंजन शर्मा (धामणगाव), अश्विनी मोतीजा (उल्हासनगर), गिरीश नारायण आणि विनोद मोटवानी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. सर्व कलाकारांनी आपल्या अभिनयाने चित्रपटाला जिवंत केले आहे. गहेरो आ इश्क' हा एक कौटुंबिक आणि रोमँटिक चित्रपट आहे, जो प्रेम, नातेसंबंध आणि कौटुंबिक मूल्यांभोवती फिरतो. हा चित्रपट प्रेक्षकांना भावनिकरित्या गुंतवून ठेवेल आणि त्याचबरोबर भरपूर मनोरंजनही देईल. या चित्रपटाचे चित्रीकरण अमरावती आणि मुंबईतील विविध आकर्षक ठिकाणी करण्यात आले आहे. चित्रपटाचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, यातील बहुतेक कलाकार आणि तंत्रज्ञ अमरावतीचे आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार दि ३० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com






# जन्मापुर्वीच घात, करतात गर्भपात...

# राजकीय ॲक्टर, स्त्रीभृणहत्येचा फॅक्टर, अविवेकी डॉक्टर !

* आमदारकीचे स्वप्न पाहणाऱ्या अविवेकी डॉक्टरला गर्भपातातून कोट्यवधीची लॉटरी
* राजाश्रय लाभलेल्या अविवेकी डॉक्टरचा महापराक्रम
* आरोग्य व पोलीस विभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह

● अतिष देशमुख @वाशीम ●

विधानसभा निवडणूकीत राष्ट्रभक्तीचा ढोल वाजवणाऱ्या पक्षाचे तिकीट मिळण्यासाठी मागील ३० वर्षापासुन उमेदवारीच्या प्रतीक्षेत असलेल्या मालेगाव येथील कथित डॉक्टरने गर्भपाताच्या बेकायदेशीर व्यवसायातून कोट्यवधीची अपसंपदा गोळा केल्याची जिल्हाभरात चर्चा आहे.आरोग्य विभागाने बेकायदेशीर सुरू असलेल्या 'अविवेकी' डॉक्टरसह काही सहकाऱ्यांवर कारवाई केली असली तरी 'या' कारवाईत आरोग्य अधिकारी व पोलीसांना माहिती असलेल्या अधिकाऱ्यांच्या मते अज्ञात असलेल्या महिला डॉक्टरला वाचविण्यासाठी अविवेकी डॉक्टरने त्याचे 'देव' पाण्यात ठेवल्याची चर्चा आहे.




पुर्वी अकोला जिल्ह्यात आणि सद्या वाशीम जिल्ह्यात असलेल्या मालेगाव नगरीत सद्या बेकायदेशीर गर्भपाताच्या माध्यमातून कोट्यधिश झालेल्या अविवेकी डॉक्टरच्या वडीलांचे कार्य वैद्यकीय क्षेत्रात रूग्णसेवेच्या क्षेत्रात कौतुकास्पद होते.वडीलांच्या पुण्याईवर डॉक्टर झालेल्या 'अविवेकी ' कारट्याला वाशीम विधानसभा मतदारसंघाचा आमदारकीचे वेड लागलेले आहे.गडगंज पैसा असुनही आमदार न झाल्यामुळे या अविवेकी डॉक्टरने मालेगाव नगरीचा सरपंच होण्यावर समाधान मानले होते.सद्या निवडणूकीत जिंकण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च लागत असल्याने 'या' अविवेकी डॉक्टरने चक्क मालेगाव नगरीत बेकायदेशीर गर्भ लिंग निदान चाचणी सह स्त्री भृण हत्या करण्याचा महापराक्रम केल्याची चर्चा आहे. फक्त वाशीम जिल्ह्यातच नव्हेतर विदर्भ, मराठवाड्यासह महाराष्ट्रासह इतर




राज्यातील शेकडो लाभार्थींना अविवेकी डॉक्टरच्या दवाखान्याचे नाव माहित आहे.गर्भपातासाठी प्रसिद्ध असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या या कुकर्मात त्याचे परिचयातील काही डॉक्टर मंडळी आणि कंपाऊंडरची नोकरी करून बोगस डॉक्टर म्हणून समाजात वावरणाऱ्या दलालांनी सुद्धा या कुकर्माच्या माध्यमातून लक्षावधीची कमाई केल्याची जनतेत चर्चा आहे.

मालेगावच्या अविवेकी डॉक्टरच्या दवाखान्यात बेकायदेशीर सुरू असलेल्या या गोरखधंद्याबाबत आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी कायदेशीर कारवाई करण्याचे धाडस केले आहे.परंतु त्या धाडसी अधिकाऱ्याने मालेगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत या कुकर्मात सहभागी असणाऱ्या महिला डॉक्टरला 'अज्ञात ' दर्शविले आहे.मालेगाव पोलीसांना सुद्धा त्या अज्ञात महिला डॉक्टरची माहिती असून आता त्या अज्ञात महिला डॉक्टरच्या नावाचा उलगडा होईल का ? राज्यात सत्ताधारी पक्षाचा निष्ठावान कार्यकर्ता असलेल्या अविवेकी डॉक्टरच्या महापापाला झाकण्यासाठी सत्ताधारी अविवेकाला साथ देवून हे प्रकरण रफादफा करण्यासाठी पुढाकार घेणार ? याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे.

# पेट्रोल पंपावर बनावट नोटांचा मोठा पर्दाफाश !



## २३.५० लाखांच्या खोट्या नोटांसह सात जण पोलिसांच्या जाळ्यात

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात बनावट चलनाचा मोठा प्रकार उघडकीस आला असून पेट्रोल पंपावर डिझेलचे पैसे देताना संशयितांनी वापरलेल्या नोटांमुळे हा संपूर्ण प्रकार समोर आला आहे. पोलिसांनी कारमधून तब्बल २३ लाख ५० हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या असून या प्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काही व्यक्ती कारने एका पेट्रोल पंपावर आले आणि डिझेल भरल्यानंतर रोख रक्कम देऊन पैसे चुकते केले. मात्र, पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांना




नोटांबाबत संशय आल्याने त्यांनी त्या बारकाईने तपासल्या. त्यावेळी नोटांवर 'CHILDREN BANK OF INDIA' असे लिहिलेले असल्याचे निदर्शनास आले.घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत वाहनाची झडती घेतली. तपासादरम्यान मोठ्या प्रमाणात बनावट नोटा आढळून आल्या. जप्त करण्यात आलेल्या नोटांची एकूण किंमत सुमारे २३.५० लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून बनावट चलनाचा वापर करून फसवणूक करण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी सात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून नोटा कुठून आणल्या, त्यामागे आणखी कोणाचे जाळे कार्यरत आहे का, याचा सखोल तपास सुरू केला आहे.या कारवाईमुळे बनावट नोटांच्या व्यवहारावर मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### पेट्रोल-डिझेल दरवाढ, खतटंचाई व नीट परीक्षा गोंधळाविरोधात...

# महाविकास आघाडी आक्रमक !






● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

पेट्रोल-डिझेलच्या सातत्याने होत असलेल्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांवर वाढता आर्थिक भार पडत असून महागाईने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तसेच जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व खताचा पुरवठा सुरळीत करण्यात यावा, नीट परीक्षेतील गोंधळाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच शेतकऱ्यांवरील वाढीव पाणीपट्टीचा भार कमी करावा, या मागण्यांसाठी महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात केंद्र सरकारच्या इंधन दरवाढीच्या धोरणावर टीका करण्यात आली असून, वाढत्या पेट्रोल-डिझेलच्या किमतींमुळे वाहतूक खर्च वाढून जीवनावश्यक वस्तूंचे दरही गगनाला भिडत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सध्या खरीप हंगामाची तयारी सुरू असल्याने शेतकऱ्यांना डिझेल व खताचा पुरेसा पुरवठा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याचेही सांगण्यात आले.तसेच २०२०-२१ मध्ये हेक्टरी १२० रुपये असलेली पाणीपट्टी वाढवून १२०० रुपये करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी असून ही वाढ मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

नीट परीक्षेतील कथित गोंधळाबाबत निष्पक्ष चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली.या निवेदनावर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाप्रमुख राजूभाऊ किडसे पाटील तसेच आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष राम डोरले पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.महाविकास आघाडीच्या नेत्यांनी जनतेच्या प्रश्नांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला.

## थोडक्यात

### वैद्यकीय अधिकारी डॉ. नासिर अहमद यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



महाराष्ट्रातील वाशिम जिल्ह्यातील तोंडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी डॉ. नासिर अहमद यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले आहे.ईदचा सण साजरा करण्यासाठी ते आपल्या पत्नी समवेत नांदेड कडे जात असताना रेल्वे स्थानकावर त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांच्या सर्व प्रयत्नांनंतरही त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. नासिर अहमद यांनी यापूर्वी बीड जिल्ह्यातील वणी पीएचसी तसेच आसेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात २००९ ते २०१६ या कालावधीत सेवा बजावली होती. त्या नंतर त्यांची बदली वाशिम जिल्ह्यातील तोंडगाव येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून झाली होती.त्यांच्या निधनामुळे वैद्यकीय क्षेत्रासह परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून शोककळा पसरली आहे.

# ग्राहक संरक्षण परिषदेतील तक्रारींवर कालमयदित कारवाई करा -अप्पर जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

नियमाने ग्राहकांना विविध प्रकारचे संरक्षण दिले असून, त्यांना उत्तम दर्जाच्या सेवा आणि वस्तू मिळाव्यात तसेच त्यांची कुठेही फसवणूक होऊ नये यासाठी कडक नियमावली करण्यात आली आहे. जिल्ह्यात सर्वत्र या नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेत दाखल होणाऱ्या ग्राहकांच्या सर्व तक्रारींवर संबंधित विभागांनी कालमर्यादेत आणि गतीने कारवाई केली पाहिजे, असे निर्देश अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी बैठकीला जिल्हा पुरवठा अधिकारी दीपक बाजड यांच्यासह अशासकीय सदस्य जुगल किशोर कोठारी, अभय खेडकर , संगीता इंगोले, गजानन साळी, प्रमोद लक्रस, अतिष देशमुख ,प्रभाकर दहापुते आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

**रमहा कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश**

अप्पर जिल्हाधिकारी पाटील यांनी सांगितले की, ग्राहक परिषदेकडे काही निवेदने व तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यांचे तातडीने निराकरण झाले पाहिजे. सर्व संबंधित विभागांनी या कारवाईचा आढावा घेऊन दरमहा आपला अहवाल प्रशासनाकडे सादर करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

**सामूहिक प्रश्नांना प्राधान्य देण्याचे आवाहन**

ग्राहकांना कमी कालावधीत अधिक आणि प्रभावी दिलासा कसा देता येईल, यासाठी प्रशासकीय विभागांसह अशासकीय सदस्यांनीही योग्य समन्वय ठेवून सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# जांभरुण येथील पाणी प्रश्न पेटला, रास्ता रोकला !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



वाशिम तालुक्यातील जांभरुण परिसरामध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सोनू ताई मुळे यांच्या नेतृत्वात संतप्त ग्रामस्थ व क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने वाशिम-रिसोड हायवेवर रास्ता रोको चक्काजाम आंदोलन वाशिम-रिसोड महामार्गावर रास्ता रोको व चक्काजाम आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

गेल्या अनेक महिन्यांपासून गावामध्ये नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. महिलांना व नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक किलोमीटर पायपीट करावी लागत असून प्रशासनाकडे वारंवार मागणी करूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.आज सकाळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला, युवक व क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते वाशिम-रिसोड हायवेवर एकत्र आले. यावेळी 'पाणी द्या अन्यथा खुर्ची खाली करा', 'झोपलेल्या प्रशासनाला जागे करा', 'जलजीवन मिशनचा हिशोब द्या' अशा घोषणा देत संतप्त आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाचा निषेध केला.

रास्ता रोको आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती. जांभरुण गावातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा, तातडीने टँकर व्यवस्था व कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असून मागण्या पूर्ण न झाल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संतप्त ग्रामस्थ व क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.यावेळी आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, तात्काळ पाणीपुरवठा सुरू करण्यात आला नाही तर जिल्हाधिकारी कार्यालयावर घागर मोर्चा काढण्यात येईल.या आंदोलनात सोनू प्रवीण मुळे, सतीश इडोळे, बालाजी मोरे, नामदेव पतंगे, प्रवीण मते, मनोहर सावके, अभिषेक मोहळे, अरुण खडसे, महादेव जाधव, सुनील कटारे यांच्यासह गावातील मोठ्या संख्येने महिला व नागरिक सहभागी झाले होते.घटनेची गंभीरता लक्षात घेता पोलिस प्रशासनाकडून मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता.

## जाहीर नोटीस

आम्ही प्रसिद्धीपत्रा द्वारे जाहीर खुलासा करतो की ; याद्वारे लोकांना कळवण्यात येते की मोजे शेदुर्जना मलापुर ता. मंगरूळपीर जि. वाशिम येथील सर्वे नंबर गट/क्र.२४/४/क्षेत्र ०.२१.३०. हे.आर. फेरफार क्र.५०२. आकार ०.२९. आकार रुपये. निलेश मोतीराम महाले रा. शेंदुर्जन मोरे.ता. मंगरूळपीर.जि. वाशिम यांच्या मालकीचे हे शेत उत्तम प्रल्हाद लकडे राहणार शेंदुर्जना मोरे तालुका मंगरूळपीर जिल्हा वाशिम यांनी खरेदी हक्काने शेतजमीन विकत घेण्याचा सौदा झाला आहे. वरील सर्वे नंबर २४/४/गटाचे मूल्यांकन रक्कम इसार पट मध्ये दिली असून राहीलेली रक्कम खरेदी वर देण्याचे ठरवले आहे या गटा तील चार ही बाजू कडे झाडे व इतर मालमत्ता सहित विकत घ्यावयाचे ठरवले असून. वरील मालमत्ते बाबत कोणाचे हीत संबंध असल्यास किंवा काही हरकती असल्यास लेखी स्वरूपात १० दिवसाचे आत खालील पत्त्यावर कळवावे व मुदती नंतर आलेल्या हरकती आक्षेप. विचारात घेतल्या जाणार नाही किंवा आम्ही जबाबदार राहणार नाही व न्यायालया कडून कोणती ही कारवाई घेण्यास पात्र राहणार नाही याची नोंद घ्यावी..

**दिनांक** ३०/०५/२०२६.

**उत्तम प्रल्हाद लकडे,** रा. शेंदूरजना मोरे ता. मंगरूळपीर जि. वाशिम ह.मु. वाघोली पुणे ता.जि. पुणे

### पाच-पाच टक्क्यांच्या वाटणीत स्मशानभूमीचा निधी गिळंकृत !

# मृतकाच्या टाळुवरील खाल्ले लोणी !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

केनवड परिसरातील एका गावात स्मशानभूमी सुशोभीकरणासाठी मंजूर झालेला लाखो रुपयांचा निधी विकासकामांवर खर्च होण्याऐवजी 'पाच-पाच टक्क्यांच्या वाटणीत' अर्ध्याहून अधिक संपल्याचा गंभीर आरोप पुढे येत आहे. गावपातळीपासून ते संबंधित प्रशासनातील काही अधिकारी-कर्मचाऱ्यांपर्यंत निधीचे कथित टक्केवारीनुसार वाटप झाल्याने प्रत्यक्ष काम मात्र मंजूर इस्टिमेटनुसार आणि अपेक्षित दर्जाचे झाले नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

**जनतेच्या पैशाचा हिशोब मागणार, सिटी न्यूज सुपरफास्ट पुराव्यांसह सत्य समोर आणणार!**

ग्रामपंचायतीला १५ वा वित्त आयोग, १४ वा वित्त आयोग, जिल्हा वार्षिक योजना, आमदार-खासदार निधी, दलित वस्ती सुधार योजना, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग तसेच ग्रामपंचायतीच्या स्वतःच्या उत्पन्नातून विविध विकासकामांसाठी निधी प्राप्त होत असतो. संबंधित गावात या निधीतून मंजूर करण्यात आलेली कामे प्रत्यक्षात झाली का, कामांचा दर्जा काय आहे आणि निधीचा वापर नियमानुसार झाला का, याबाबतची सखोल माहिती व महत्त्वाचे कागदोपत्री पुरावे सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती लागले आहेत. या प्रकरणातील कागदपत्रांची पडताळणी सुरू असून निधीच्या खर्चासंदर्भातील अनेक बाबी संशयाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. त्यामुळे संबंधित लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कंत्राटदार आणि काही अधिकाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून अनेकांचे धाबे दणाणले आहेत.विशेष म्हणजे, स्मशानभूमीसाठी मंजूर झालेल्या निधीतून करण्यात आलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी, मंजूर अंदाजपत्रक, खर्चाची नोंद आणि कामांचा दर्जा याबाबतची माहितीही समोर येत आहे

स्मशानभूमी हे प्रत्येक गावासाठी अत्यंत महत्त्वाचे आणि संवेदनशील ठिकाण असताना, त्याच्या विकासासाठी आलेल्या निधीवरच डल्ला मारल्याचा आरोप होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. कागदोपत्री कामे पूर्ण दाखवून प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाचे बांधकाम करण्यात आले का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.


**भाग- २ मध्ये नावांसह होणार मोठा खुलासा**



विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित निधीच्या खर्चाबाबतची अनेक कागदपत्रे, पुरावे आणि व्यवहारांची माहिती सिटी न्यूज सुपरफास्टकडे उपलब्ध झाली आहे. या पुराव्यांच्या आधारे निधी कोणाकडून, कोणाकडे आणि किती टक्क्यांच्या स्वरूपात गेला, याचा तपशील लवकरच समोर येण्याची शक्यता आहे.

# डिझेलनंतर आता ग्रामीण भागात गॅस टंचाईचे चटके; नागरिक हैराण !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



एकीकडे डिझेल टंचाईने शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त असताना, आता घरगुती गॅस टंचाईही सामान्यांचे कंबरडे मोडण्यास सुरुवात केली आहे. ग्रामीण भागात गॅस सिलेंडर वेळेवर मिळत नसल्याने अनेक कुटुंबांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करून गॅस सुरळीत मिळावा यासाठी प्रयत्न करावेत. असल्याची तक्रार नागरिकांतून व्यक्त होत आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील कुटुंबांमध्ये ङगॅसअभावी पुन्हा चूल पेटली; वेळेत गॅस उपलब्ध होत नसल्यामुळे स्वयंपाकाचा गंभीर प्रश्न स्वयंपाकासाठी लागणारा गॅस लवकर संपत असल्याने गृहिणींसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. घरातील गॅस संपल्यानंतर नाईलाजाने पुन्हा पारंपरिक चूल पेटवून स्वयंपाक करण्याची वेळ अनेक कुटुंबांवर आली असल्याचे चित्र ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे. शासनाच्या विविध योजनांमुळे ग्रामीण भाग धुरमुक्त झाल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात गॅस वेळेवर मिळत नसेल, तर सामान्य नागरिकांनी करायचे तरी काय? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. वाढत्या गैरसोयीमुळे महिलांमध्ये व नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून, ग्रामीण भागातील गॅस पुरवठा करण्याची मुदत कमी करून ३ दिवसांनी गॅस देण्यात यावा जेणे करून मोठ्या कुटुंबातील सदस्यांची होणारी परवड थांबेल. यासाठी तात्काळ सुरळीत गॅस करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शनिवार, दि. ३० मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## भूमी अभिलेख विभागाविरोधात शेतकऱ्याचे उपोषण

**जळगाव जामोद :** तालुक्यातील पिंप्री खोद्री शिवारातील सर्व्हे क्रमांक १८ व २० मधील गट क्रमांक ३६ च्या शेतमोजणी प्रकरणात भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कर्तव्यात हलगर्जीपणा व कसूर केल्याचा आरोप करत सुलज येथील शेतकरी ज्ञानदेव ओंकार नळकांडे यांनी उपोषण आंदोलन सुरू केले आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर २८ मेपासून सुरू झालेल्या या आंदोलनाला सुलज येथील ग्रामस्थांनीही पाठिंबा दर्शविला असून, मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपोषणस्थळी उपस्थित होते.

मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानदेव नळकांडे यांनी दि. ६ जून २०२३ रोजी भूमी अभिलेख कार्यालय, जळगाव जामोद येथे शेतमोजणीसाठी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी करण्यात आलेली मोजणी अर्धवट व चुकीची असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही तब्बल सहा महिन्यांनंतर 'क प्रत' उपलब्ध करून देण्यात आली. मात्र, त्या प्रतीमध्ये एका बाजूच्या मोजमापाची माहिती नसल्याने ती त्रुटीपूर्ण असल्याचे संबंधित शेतकऱ्याचे म्हणणे आहे.

# बुलढाणा रोडवरील रहिवाशांना पावसाळ्यात पुराचा धोका

### ◆ नाल्या खोलीकरण न झाल्यास ३ जूनला 'रास्ता रोको' चा शिवसेना (उबाठा) चा इशारा

प्रतिनिधी ३० मे

### शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर सह ग्रामस्थांचे तहसीलदारांना निवेदन



**मलकापुर :** पावसाळा तोंडावर आलेला असतानाच, बुलढाणा रोडने येणारे पावसाचे पाणी रस्त्यालगत असलेल्या विविध नगरांमधील रहिवाशांच्या घरात घुसून दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान होते. यंदा पावसाळ्यापूर्वी यावर ठोस उपाययोजना न केल्यास आणि नाल्यांचे खोदकाम न झाल्यास येत्या ३ जून रोजी बुलढाणा रोडवरील बोदवड चौफुलीजवळ तीव्र 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी प्रशासनाला दिला आहे. यासंदर्भातील एक सविस्तर निवेदन मलकापूरच्या तहसीलदारांना सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, वाकोडी ग्रामपंचायत व मलकापूर ग्रामीण ग्रामपंचायत हद्दीतील तुलसी नगर (भाग १ व २), शिवशक्ती नगर, नालंदा नगर, सरस्वती नगर, वृंदावन नगर (भाग १, २, ३, ४), गोपाळकृष्ण नगर, हनुमान नगर, हरीकिरण सोसायटी, चैतन्य वाडी, आनंद सोसायटी या परिसरातील नागरिकांना दरवर्षी पावसाळ्यात भीषण परिस्थितीचा सामना करावा लागतो.

कमरेपर्यंत पाणी साचल्याने सापांचाही वावर वाढतोय बुलढाणा रोडने दाताळ्याकडून येणारे पाणी रस्त्याच्या दुतर्फा नाल्या खोल नसल्यामुळे थेट रहिवासी भागात शिरते. बोदवड रोडवरील चौफुलीवरून वाहणाऱ्या या पाण्यामुळे नागरिकांच्या घरात कमरेपर्यंत, म्हणजेच तब्बल तीन-तीन फूट पाणी साचते. यामुळे घरातील संसारोपयोगी साहित्य, वाहने, विहिरी आणि बोअरवेल यांचे अतोनात नुकसान होते. एवढेच नव्हे तर, या साचलेल्या पाण्यात साप, विंचू यांसारख्या विषारी प्राण्यांचा वावर वाढत असल्याने नागरिकांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे.

प्रशासनाला सुचवला पर्याय या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा सुचवताना गजानन ठोसर यांनी निवेदनात म्हटले आहे की, दाताळ्याकडून बुलढाणा रोडने येणारे पाणी वाकोडी फाट्याजवळ व बोदवड रोडजवळील चौफुलीजवळ नाल्याचे खोदकाम करून जर नळगंगा नदी पात्रात काढण्यात आले, तर हजारो ग्रामस्थांचे होणारे नुकसान टाळता येऊ शकते.

५ दिवसांचा अल्टिमेटम अन् आंदोलनाचा इशारा प्रशासनाने या अत्यंत ज्वलंत प्रश्नावर येत्या ५ दिवसांत योग्य तो निर्णय घेऊन त्वरित कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जर मुदतीत यावर मार्ग निघाला नाही, तर बुधवार दि. ३ जून २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समस्त ग्रामस्थांसह बुलढाणा रोडवरील बोदवड चौफुलीजवळ तीव्र 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही ठोसर यांनी दिला आहे. निवेदनावर शिवसेना शहर प्रमुख हरीदास गणबास, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, नगरसेवक रफीकभाई बर्तनवाले, शिवसेना उपशहर प्रमुख बाळू पोलाखरे, उपशहरप्रमुख शकील जमादार, माजी नगरसेवक पांडुरंग चिम, युवासेना तालुकाप्रमुख पवन गरुड, किसान सेना तालुका उपप्रमुख गजानन मेहंगे, विजय झांबरे, संजय वायडे, सत्तार शाह, दामोदर सुशीर, विजय पाटील, विनोद मोरे, श्रीकांत कळमकर, फकीरचंद चांडक, प्रकाशलाल जैस्वाल, सुनील भोपळे, संतोष पाचपोळ, संजय चोपडे, विनोद घुले, सुनील खर्चे, रामसिंग राजपूत, चंदनसिंग राजपूत, योगेश भंसाली, महादेव खिर्डीकर, विजय संबारे रामदास थाटे, विलास पाटील, गोवर्धनदास भुतडा ,उल्हास मापारी, राजमल नाहार, विश्वनाथ मघाडे, जीवनलाल बांगडे, सुरेश कोंगळे ,प्रदीप कोलते, शुभम भोळे, अजितसिंग राजपूत, रवींद्र पाटील, प्रेम पाटील, लखन चांडक, दुर्गादास जोशी, संजय नाफडे, संजय जोशी, विजय चांडक, राजेंद्रसिंग राजपूत, रमेश सिंह पवार, अनिल चोपडे, अतुल पाटील, विनोद चौबे, राजेंद्र कोलते, लक्ष्मण खाचणे, महेश खाचणे, गजेंद्रसिंग चव्हाण, पंकज मोरे सह आदी रहिवासी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.

## पिंपळगाव राजा येथे घराचे बांधकाम सुरू असताना भिंत कोसळली; दोघांचा दबून मृत्यू

### ◆ पिंपळगाव राजा येथील घटनाः पोलिस ठाण्यात नोंद

प्रतिनिधी ३० मे



मुकद्दरखाँ जमरुदखाँ मृतक



शेख युसुफ शे. बिसमिल्ला मृतक

**खामगाव:** तालुक्यातील पिंपळगाव राजा येथे घराचे बांधकाम सुरू असताना भिंत कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. गुरुवारी (दि. २८ मे) रात्री घडलेल्या घटनेने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

अहमद खान मुकद्दर खान यांच्या घराच्या तळमजल्याचे बांधकाम सुरू होते. बांधकामाला पाणी देण्याचे काम सुरू असतानाच अचानक भिंतीचा मोठा भाग कोसळला. या दुर्घटनेत मुकद्दर खान जमशद खान (वय ७४) आणि शेख युसुफ शेख बिसमिल्ला (वय ३८), (दोघेही रा. पिंपळगाव राजा, ता. खामगाव), यांचा भिंतीखाली दबून जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. ढिगाऱ्याखालून दोघांना बाहेर काढण्यात आले; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच ठाणेदार भागवत मुळीक यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.पिंपळगाव राजा येथे बांधकाम सुरू असताना भिंत कोसळून दोघांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर बांधकाम स्थळांवरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. योग्य सुरक्षितता उपाययोजना, बांधकामाची मजबुती आणि कामादरम्यान आवश्यक खबरदारी घेतली गेली होती का, असा प्रश्न आता उपस्थित केला जात असून, निष्काळजीमुळे दोघांचा जीव गेल्याची चर्चा आहे.

दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी खामगाव येथील सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले. दरम्यान, सामान्य रुग्णालयातील डॉ. चरखा यांच्या वतीने कक्षसेवक विलास शिवराम वडोदे यांनी खामगाव शहर पोलिसांत मेमो सादर केला. त्यावरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली. याप्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

## 'आरटीई' प्रक्रिया; पहिल्या प्रतीक्षा यादीतील ४३० पैकी ३११ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित!

### अनपेक्षित शाळा न मिळाल्याने बालकांमध्ये नाराजीचा सूर!

प्रतिनिधी ३० मे

**खामगाव:** शिक्षण हक्क कायद्यानुसार आरटीई) खासगी शाळांमधील २५ क्के राखीव जागांवरील वेशासाठी जिल्ह्यात सुरू सलेल्या प्रवेश प्रक्रियेत हिल्या प्रतीक्षा यादीत ३० विद्यार्थ्यांपैकी ३११ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित पाले आहेत. या फेरीतील वेशासाठीची अंतिम मुदत क्रवार, दि. २९ मे रोजी संपुष्टात बाली असून, उर्वरित पालकांना आता निसऱ्या निवड यादीची प्रतीक्षा लागली बाहे. जिल्ह्यातील २२६ पात्र शाळांमध्ये बारटीई अंतर्गत एकूण २९३३ जागा खीव ठेवण्यात आल्या आहेत. यासाठी दा ६ हजार १७१ पेक्षा अधिक अर्ज ाप्त झाले होते. १० एप्रिल रोजी पहिली नवड यादी जाहीर करण्यात आली होती.पहिल्या यादीत २८०१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. त्यापैकी २२२० विद्यार्थ्यांनी संबंधित शाळांमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेश निश्चित केला; मात्र ५११ जागा रिक्त राहिल्याने शिक्षण विभागाकडून दुसरी निवड यादी जाहीर करण्यात आली. दुसऱ्या फेरीत ४३० विद्यार्थ्यांची निवड झाली होती. या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी दहा दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. या कालावधीत ३११ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून काही जागा अद्याप रिक्त आहेत.

**पालकांकडून प्रवेशास नकार**

अनेक विद्यार्थ्यांना अपेक्षित शाळांमध्ये प्रवेश न मिळाल्याने काही पालकांनी निवड होऊनही प्रवेश नाकारल्याची माहिती समोर आली आहे. अलॉटमेंट लेटर मिळाल्यानंतर संबंधित शाळांमध्ये जाऊन कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश घेण्याबाबत शिक्षण विभागाकडून सूचना देण्यात आल्या होत्या; मात्र पसंतीच्या शाळेत प्रवेश न मिळणे ही प्रमुख कारणे समोर येत आहेत. शिक्षण विभागाने ज्या पालकांच्या पाल्यांची निवड झाली आहे, त्यांनी तत्काळ संबंधित शाळांशी संपर्क साधून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे. मुदत संपल्यानंतर संबंधित जागेवरील दावा आपोआप रद्द होणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### वाकोडी ग्रामपंचायत प्रशासनाचा ढिसाळ कारभार!

## रस्त्यावर टाकले मोठे दगड; ग्रामस्थ, अबाल वृद्धांची जीवघेणी कसरत

### शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांचा आक्रमक पवित्रा; पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण न झाल्यास ग्रा.प समोर ग्रामस्थांसह आमरण उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी ३० मे



मलकापुर:- तालुक्यातील वाकोडी ग्रामपंचायत प्रशासनाच्या अत्यंत बेजबाबदार आणि संथ कारभारामुळे स्थानिक ग्रामस्थांना मरणयातना सहन कराव्या लागत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वाकोडी ग्रामपंचायत हद्दीतील तुलसीनगर भाग १, २ व शिवशक्ती नगर येथील जोड रस्त्याचे काम गेल्या ८ ते ९ महिन्यांपूर्वी सुरू केले ते काम अर्धवट अवस्थेत सोडून संपूर्ण रस्त्यावर प्रशासनाने मोठे मोठे दगड (खडीकरण व मोठे गोटे) आणून टाकले आहेत. यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या चिमुरड्यांना, अबालवृद्धांना आणि महिलांना जीव मुठीत धरून तारेवरची कसरत करावी लागत आहे.

या गंभीर समस्येकडे स्थानिक प्रशासनाने पूर्णपणे डोळेझाक केली असून, येथील सांडपाण्याची व नाल्यांची व्यवस्था देखील कोलमडली आहे. यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या भागात राहणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी वॉर्ड क्र. ३ मधील तुलसीनगर येथील रामदास थाटे यांच्या घरापासून ते थेट शिवशक्ती नगरातील हनुमान मंदिरापर्यंत जोड रस्त्याचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र, कंत्राटदार आणि ग्रामपंचायत प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे हा रस्ता आता अपघाताचे मुख्य केंद्र बनला आहे. रस्त्यावरील मोठ्या दगडांमुळे पादचाऱ्यांना चालणे असह्य झाले असून, दुचाकी वाहने घसरून अनेक नागरिक जखमी झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर, स्थानिक ग्रामस्थांच्या तीव्र असंतोषाला वाचा फोडण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळाने थेट मलकापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी (अ्ध्) यांना निवेदन सादर करून प्रशासनाला धारेवर धरले. या निवेदनाद्वारे ठोसर यांनी चेतावणी दिली आहे की, आगामी पावसाळा तोंडावर आला असून, पावसाळ्यापूर्वी या रस्त्याचे काम युद्धपातळीवर आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात यावे. जर पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण झाले नाही, तर संपूर्ण रस्त्याची चिखलवाट होईल आणि ग्रामस्थांचे जगणे असह्य होईल. प्रशासकीय उदासीनतेचा तीव्र निषेध करत गजानन ठोसर यांनी ग्रामस्थांसह थेट ग्रा.प समोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. तसेच या आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला आणि ग्रामस्थांच्या रोषाला सर्वस्वी गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत प्रशासनच जबाबदार राहील असा इशारा दिला आहे.निवेदनावर शिवसेना शहर प्रमुख हरीदास गणबास, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, नगरसेवक रफीकभाई बर्तनवाले, शिवसेना उपशहर प्रमुख बाळू पोलाखरे, उपशहरप्रमुख शकील जमादार, माजी नगरसेवक पांडुरंग चिम, युवासेना तालुकाप्रमुख पवन गरुड, आदी रहिवासी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.

## वडजी भेंडीत दोन गटांत हाणामारी; परस्परांविरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी ३० मे

**खामगाव:** तालुक्यातील वडजी भेंडी येथे किरकोळ कारणावरून दोन गटांत झालेल्या तुफान हाणामारीमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेत दोन्ही बाजूंचे काहीजण जखमी झाले असून, पिंपळगाव राजा पोलिसांनी दोन्ही गटांच्या तक्रारीवरून परस्परांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. लोखंडी पाईप, धारदार वस्तू तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण झाल्याच्या आरोपांमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि.२८) सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास गावातील एका किरकोळ वादातून हा प्रकार घडला. पहिल्या प्रकरणात फिर्यादी कुणाल गुलाबराव हाडे (२०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गावातील काही बोलचालीवरून त्यांच्यात आणि आरोपींमध्ये वाद निर्माण झाला. वाद वाढल्यानंतर आरोपींकडून शिवीगाळ करण्यात आली. त्यानंतर निवृत्ती गोपाल बोदडे यांनी कुणाल हाडे यांच्या डोक्यात लोखंडी पाईप मारून जखमी केल्याचा आरोप करण्यात आला आहे तसेच मंगेश बोदडे यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सिंधुबाई बोदडे, निवृत्ती बोदडे आणि मंगेश बोदडे (सर्व रा. वडजी भेंडी) यांच्याविरोधात भारतीय न्यायसंहिता कलम ११८ (१), ३५२ आणि ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दुसऱ्या प्रकरणात फिर्यादी निवृत्ती गोपाल बोदडे (२९) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते दूध डेअरीवरून घरी परतत असताना दुसऱ्या गटासोबत त्यांचा वाद झाला. त्यानंतर दोन्ही बाजूंमध्ये जोरदार हाणामारी झाली. या घटनेत कुणाल हाडे यांनी लोखंडी पाईपने मारहाण करून जखमी केल्याचा आरोप आहे तसेच गुलाबराव हाडे यांनी धारदार वस्तूने हल्ला केल्याचे, तर वैभव हाडे यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी गुलाबराव हाडे, कुणाल हाडे आणि वैभव हाडे (सर्व रा. वडजी भेंडी) यांच्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दोन्ही गुन्हे पोलिस हवालदार रामदास गायकवाड यांनी नोंदविले असून, पुढील तपास पोलिस हवालदार एकनाथ खांदे हे ठाणेदारांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत.

## मलकापूर तालुक्यातील सर्वधर्मिय गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे ६ जून रोजी आयोजन

प्रतिनिधी ३० मे

### तालुकानिवासी परंतु तालुक्याबाहेर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करण्याचे इंजि. सचिन तायडे यांचे आवाहन

**मलकापुर:** दरवर्षी प्रमाणे यंदाही सर्वधर्मिय गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन मराठा सेवा संघाच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून ६ जून रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती शिवराय मराठा मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आले असून पात्र गुणवंत विद्यार्थ्यांनी त्यांची नावे लवकरात लवकर नोंदवावी, असे आवाहन मराठा सेवा संघ परिवार मलकापूर शहर व तालुक्याच्या वतीने जिल्हा सचिव इंजि.सचिन तायडे यांनी केले आहे.

तालुक्यातील इयत्ता दहावी परिक्षेत ८५ टक्के पेक्षा जास्त व बारावीच्या परिक्षेत ८५ टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झालेल्या सर्वधर्मिय विद्यार्थ्यांचा तसेच इतर विविध क्षेत्रातील गुणवंतांचा व विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन ६ जून रोजी करण्यात आले आहे.

मलकापूर तालुक्यातील १० वी व १२ वी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांची सर्व शाळांमधून सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांची सद्यस्थितीतील माहिती प्राप्त केली आहे. तालुका निवासी मात्र काही कारणास्तव तालुक्याच्या बाहेर शिकणाऱ्या पात्र, स्पर्धा परीक्षेत यश मिळविणाऱ्या, नामांकित विद्यालयात प्रवेश मिळालेले विद्यार्थी, शैक्षणिक क्षेत्रासह क्रीडा, किंवा इतर क्षेत्रात प्राविण्य मिळालेल्या तसेच विविध स्पर्धा परीक्षांमधून शासकीय सेवेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांनी, त्यांच्या पालकांनी विद्यार्थ्यांची गुणपत्रिका, रूजू प्रमाणपत्र, निवासी पत्ता, मोबाईल नंबर मराठा सेवा संघ कार्यालय डवले कॉम्प्लेक्स हनुमान नगर रोड, विद्यार्थी किंवा पालकांना स्वतः येऊन देणे शक्य नसल्यास त्यांनी संजय रहाटे मो. ९९२२२०३५५१, रविंद्र खराटे मो.९७३०९१५००१, विष्णू म्हसागर मो.९४२२१००९३३ यांच्या मोबाईल व्हॉटस्अ?पद्वारे पाठवावे, असे आवाहन मराठा सेवा संघ परिवार मलकापूर शहर व तालुक्याच्या वतीने जिल्हा सचिव इंजि.सचिन तायडे यांनी केले आहे.

मलकापूर तालुक्यातील सर्व शाळांमधून सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांची सद्यस्थितीतील माहिती प्राप्त केली असून तालुकानिवासी मात्र काही कारणास्तव तालुका बाहेर शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी विद्यार्थ्यांची गुणपत्रिका, निवासी पत्ता, मोबाईल नंबर पाठवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कांदा उत्पादकांना प्रति क्विंटल 600 रूपंयाचा तोटा!

प्रतिनिधी ३० मे

### ◆ दर पडल्याने खर्च व उत्पन्नाचा मेळ बसेना!

**खामगाव:** कांदा उत्पादनाचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला असून प्रति क्विंटल सुमारे १४०० ते १६०० रुपये खर्च येत असल्याचे चित्र आहे. बियाणे, खते, औषधे, काढणी मजुरी आणि वाहतूक खर्चात झालेली वाढ यामुळे शेतकऱ्यांवरील आर्थिक भार अधिकच वाढला आहे. मात्र बाजारात कांद्याला मिळणारा दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने ५०० ते ६०० रुपये प्रति क्विंटल तोटा सहन करावा लागत आहे.

सध्या बाजारपेठांमध्ये कांद्याला प्रति क्विंटल सरासरी ८०० ते ११०० रुपये दर मिळत आहे. उत्पादन खर्च (१४०० ते १६०० रुपये प्रति क्विंटल) आणि बाजारभाव यातील मोठ्या तफावतीमुळे शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ५०० ते ६०० रुपयांचा थेट तोटा सहन करावा लागत आहे. उत्पादन खर्च वाढण्यामागे अनेक कारणे आहेत. ट्रॅक्टर भाडे, डिझेल दरवाढ आणि रोपे तयार करण्याचा खर्च यामुळे मशागत महागली आहे. तसेच कीड व रोगांच्या प्रादुर्भावामुळे फवारणीचा खर्च वाढला आहे.कांद्याला हमीभाव देण्याची मागणी कांद्याला किमान १५०० ते २००० रुपये प्रति क्विंटल हमीभाव किंवा थेट अनुदान देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारभाव कमी मिळत असल्याने सरकारने हस्तक्षेप करून दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



**मजुरी व इतर खर्च वाढला!**

कांदा काढणी, छाटणी आणि गोणत्यांमध्ये भरण्यासाठी मजुरीवर मोठा खर्च येत आहे. याशिवाय वाहतूक खर्च आणि बाजार समितीतील तोलाई शुल्क यामुळे एकूण उत्पादन खर्चात आणखी वाढ होत असल्याचे चित्र आहे. या परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांना उत्पादन खर्च तर दूरच, परंतु काढणी व वाहतुकीचा खर्चही स्वतःच्या खिशातून भरावा लागत आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

**वाढता उत्पादन खर्च ठरतोय मुख्य कारण**

कांदा उत्पादनात बियाणे, खते आणि औषधांचे दर वाढले असून ट्रॅक्टर भाडे व डिझेल खर्चातही वाढ झाली आहे. याशिवाय मजुरी आणि काढणी प्रक्रियेवरील खर्चामुळे एकूण उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. परिणामी नफा कमी होऊन तोटा वाढत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. ३० मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## पक्षी मित्रांमुळे मोराला जीवनदान

**वाशीम:** जिल्ह्यातील आसेगाव शेत शिवारातील एका विहिरीत पाण्याच्या शोधात असलेला एक मोर पडलयाची घटना घडली. सदर घटनेची माहिती मिळताच पक्षी मित्र विशाल सोनोने, श्रीकृष्णा वऱ्हाडे, संदीप सोनूने व धनंजय गावंडे यांनी घटना स्थळी धाव घेत विहिरीत पडलेल्या धाव घेऊन मोराला विहिरी मधून बाहेर काढले. त्या पश्चात मोराला



नैसर्गिक अधिवासात सोडण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला असता उडाता येत नसल्याने त्याला कारंजा - मंगरूळपीर वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीष जतकर तसेच वनपाल सुदर्शन सोनवणे व वनरक्षक खिराडे त्यांच्या स्वधीन केले. वन अधिकाऱ्यांनी मोराची पाहणी केली असता त्याच्या पंखाला व पायाला इजा झाल्याचे दिसून आले. या वेळी वन कर्मचाऱ्यांनी जखमी मोराला उपचार करून त्याला कारंजा वनपर्यटन येथे ठेवले असून त्याच्यावर पुढील उपचार सुरु आहे.

# रासायनिक खतांच्या वाढल्या किमती, कशी करावी शेती

## 20:20:0 :13 खताचे पोते 1350 वरून गेले 1950 वर; शेतकऱ्यांच्या जिवाला लागला घोर

प्रतिनिधी ३० मे

**अकोला:** खरीप हंगाम सुरू होण्या आधीच रासायनिक खतांच्या दरात मोठी वाढ झाल्याने सामान्य शेतकऱ्यांसाठी शेती करणे कठीण झाले आहे. मागील वर्षी १३५० रुपयात मिळणारे २०: २०: ० :१३ खताचे पोते आता १९५० पर्यंत पोहोचले आहे. अन्य खतांच्या किमतीमध्ये सुद्धा मोठी वाढ झाली आहे त्यामुळे शेती करणे सामान्य शेतकऱ्यांना अडचणीचे ठरत आहे.



### सरकारने किमती कमी कराव्यात

केंद्र सरकारने रासायनिक खतांच्या किमती तात्काळ कमी कराव्यात, अन्यथा शेतीवर अवलंबून असलेल्या सर्व क्षेत्रांवर परिणाम होईल. वाढत्या खर्चामुळे यावर्षी शेती तोट्याचा व्यवसाय होऊ शकतो, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली. **-मनीष खाडे शेतकरी**

### व्यवसाय करणे अवघड झाले आहे

शेतकऱ्यांना महागडी खते खरेदी करणे आणि विकणे अवघड झाले आहे. शिवाय, सरकारी तपासणी आणि तांत्रिक प्रक्रियांमुळे व्यवसाय करणे पूर्वीपेक्षा अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. **एक खत विक्रेता अकोला**

### उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की खरीप पिकांमध्ये रासायनिक खते किमान तीन वेळा वापरावी लागतात. त्यामुळे, वाढलेल्या खतांच्या किमतींचा थेट परिणाम उत्पादन खर्चावर होईल. हवामानातील अनिश्चितता आणि पिकांच्या कमी किमतींमुळे आधीच त्रस्त असलेले शेतकऱ्यांची चिंता आता शेतीचा खर्च दुप्पट झाल्याने अधिकच वाढली आहे. अन्य खतांचे दर दुप्पट होण्याची भीती आहे. कृषी सेवा केंद्र चालकांनाही वाढत्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. खत विक्रेत्यांचे म्हणणे आहे की वाढत्या किमतींमुळे शेतकऱ्यांच्या क्रयशक्तीवर परिणाम होत आहे. वाढलेल्या किमतीमुळे खतांची खरेदी विक्री करणे अवघड झाले आहे शिवाय लिंकिंग सिस्टीम पीओएस मशीनद्वारे विक्री आणि विविध सरकारी नियमांमुळे कृषी सेवा केंद्र चालकांवर अतिरिक्त दबाव आला आहे.

### अनेक प्रमुख खतांच्या किमतीत लक्षणीय वाढ

अहवालानुसार नऊ २४ २४ खताची किंमत १९०० रुपयांवरून २२००, १० २६ २६ खताची किंमत १९५० वरून २३५० रुपये आणि २४ २४ शून्य खताची किंमत १८०० वरून २४५० झाली आहे अमोनियम सल्फेट ची किंमत ९५० रुपयांवरून १४०० आणि दाणेदार सुपर फॉस्फेट ची किंमत ५४० वरून ६६० रुपये झाली आहे तथापि युरिया आणि डीएपी च्या किमती सध्या स्थिर आहेत.

## पक्ष्यांची तहान भागविण्यासाठी लावले पाणीपात्र..

### अकोला शहरासह ग्रामीण भागात राबविला उपक्रम...

प्रतिनिधी ३० मे

**अकोला:** जिल्ह्यात उष्णतेने उच्चांक गाठला असताना मुक्या जीवांची तहान भागवण्यासाठी अकोल्याचे सुनील कल्ले सरसावले आहेत. शहरासह ग्रामीण भागात पक्षी आणि वन्य प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करीत त्यांनी मानवतेचा अनोखा संदेश दिला आहे.

अकोला जिल्ह्यात उष्णतेचा कहर वाढत चालला असून तापमानाने तब्बल ४६ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. प्रचंड उकाड्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असताना गावलागतचे वन्य प्राणी आणि पक्ष्यांची अवस्था मात्र अधिक बिकट झाली आहे. अशा परिस्थितीत अकोल्यातील सामाजिक कार्यकर्ते सुनील कल्ले यांनी एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे.

अकोला शहरासह ग्रामीण भागातील विविध ठिकाणी त्यांनी पक्षी आणि वन्य प्राण्यांसाठी पाण्याची पात्रे ठेवण्यास सुरुवात केली आहे. वाढत्या तापमानामुळे पाण्याच्या शोधात भटकणाऱ्या पक्षी आणि प्राण्यांना दिलासा मिळावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

# अकोटच्या प्रसाद गान यांना एबीपी माझा अनमोल रत्न पुरस्कार

## शेअर बाजार क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचा राज्यस्तरीय गौरव

प्रतिनिधी ३० मे

**अकोट :** अकोट या छोट्याशा शहरातून सुरू झालेला संघर्षमय प्रवास आज महाराष्ट्रातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. शेअर बाजार क्षेत्रात हजारो युवक-युवतींना मार्गदर्शन करून आर्थिक साक्षरतेचा प्रसार करणारे 'प्रसाद कॉलिंग इन्व्हेस्टमेंट'चे संस्थापक व मार्गदर्शक प्रसाद विजय गान यांना प्रतिष्ठेचा एबीपी माझा अनमोल रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत आणि प्रसिद्ध अभिनेत्री पूजा सावंत यांच्या हस्ते त्यांचा विशेष गौरव करण्यात आला.




यावर्षी आर्थिक साक्षरता आणि शेअर बाजार शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत प्रसाद गान यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. अत्यंत सामान्य कुटुंबातून आलेल्या प्रसाद गान यांनी अकोटमधून शिक्षण घेत आपल्या करिअरची वाटचाल सुरू केली. कोणतीही व्यावसायिक पार्श्वभूमी नसताना त्यांनी स्वतःच्या जिद्द, मेहनत आणि अभ्यासाच्या बळावर पुण्यासारख्या स्पर्धात्मक शहरात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले. गेल्या चार ते पाच वर्षांत भारतीय शेअर बाजार क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. 'मराठी युवक हा केवळ नोकरी शोधणारा नसून रोजगार निर्माण करणारा उद्योजक बनला पाहिजे,' हा विचार त्यांनी आपल्या कार्याच्या केंद्रस्थानी ठेवला आहे. याच ध्येयातून त्यांनी आर्थिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम राबविले आहेत.प्रसाद गान यांनी स्थापन केलेल्या 'प्रसाद कॉलिंग इन्व्हेस्टमेंट' या संस्थेमार्फत हजारो युवक-युवतींना शेअर बाजार, गुंतवणूक, आर्थिक नियोजन, ट्रेडिंग आणि फायनान्शियल फ्रीडम याबाबत सखोल प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत स्वतःचे भविष्य घडविले आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्कारामुळे प्रसाद गान यांच्यावर महाराष्ट्रभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अकोटसारख्या छोट्या शहरातून राज्यस्तरावर आणि आर्थिक क्षेत्रात प्रभावी ओळख निर्माण करणाऱ्या या तरुण उद्योजकाच्या यशामुळे जिल्ह्याची मान उंचावली आहे.

## दर्यापूर गाडीमध्ये चढत असताना प्रवाशाच्या खिशाला कात्री..

प्रतिनिधी ३० मे

अकोला शहरातील नवीन बस स्थानकावर पाकिटमार सक्रिय झाले असूने दर्यापूरला जाण्याकरिता गाडीमध्ये चढत असताना शुक्रवारी सकाळच्या सुमारास दोन प्रवाशांच्या खिशाला कात्री बसली आहे. अकोला शहरातील डाबकी रोड भागात राहणारे डॉ जानराव सावनकर हे दर्यापूर गाडीमध्ये चढत असताना त्यांच्या खिशातील चार हजार आठशे रुपये रोख रक्कम अज्ञात चोरट्याने लंपास केले तसेच अकोला शहरामध्ये नातेवाईकाकडे आलेले हल्ली मुंबई लाराहत असलेले राजू वानखडे याच्या खिशातून ८३ हजार ३३० रुपये किमतीचा मोबाईल लंपास केला.

## मनपाच्या जन्म मृत्यू विभागाच्या कामकाजाची वेळ वाढवावी

# सीआरएस पोर्टल मध्ये तांत्रिक बिघाड

प्रतिनिधी ३० मे

**अकोला :** नवीन शैक्षणिक वर्षाचा बिगुल वाजला असून महाविद्यालयांमध्ये शाळा, प्रवेशाची लगबग सुरु झाली आहे. अशा ऐन गर्दीच्या आणि महत्त्वाच्या काळातच केंद्र सरकारच्या 'सीआरएस' पोर्टलमध्ये निर्माण झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे महापालिकेत दाखल्यांसाठी पालकांची कोंडी होत आहे. हे लक्षात घेता जन्म-मृत्यू विभागाची कार्यालयीन वेळ आता वाढवण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे

सध्या शाळांमध्ये नव्याने प्रवेश घेणाऱ्या पाल्यांसाठी




जन्माचा दाखला हा अत्यंत अनिवार्य दस्तऐवज आहे. मात्र, नेमक्या याच काळात केंद्र शासनाच्या ऑनलाईन पोर्टलमध्ये गंभीर तांत्रिक त्रुटी निर्माण झाल्या आहेत. या पोर्टलमध्ये एका वेळी केवळ एकच युजर लॉगिन राहू शकत असल्याने संपूर्ण कामकाजाचा बोजवारा उडाला आहे. एका दाखल्यासाठी कर्मचाऱ्यांना तासनतास वाट पाहावी लागत असून, दाखले निर्गमित होण्यास प्रचंड विलंब होत आहे या समस्येची गंभीरतेने दखल घेत जन्म मृत्यू विभागाच्या कामकाजाची वेळ वाढवण्याची मागणी होत आहे

## अपहरण, अत्याचार प्रकरण; आरोपीस १० वर्षांचा कारावास

प्रतिनिधी ३० मे

**खामगाव:** रेल्वे प्रवासादरम्यान अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी खामगाव जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीला १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. जिल्हा व सत्र न्यायाधीश जी. बी. जाधव यांच्या न्यायपीठाने आरोपी राहुल रमेश पवार यास दोषी ठरवत शुक्रवारी शिक्षा सुनावली. सत्र खटला क्रमांक १६/२०२३ (राज्य विरुद्ध राहुल रमेश पवार) या प्रकरणात न्यायालयाने साक्षी, वैद्यकीय अहवाल व तपासातील पुराव्यांचा सखोल अभ्यास करून हा निर्णय दिला.

# बैलाच्या दोरात अडकून ६० वर्षीय शेतकऱ्याचा जागीच मृत्यू

**मुर्तिजापूर :** शेतात नवीन बैलांच्या साहाय्याने वखरणी करत असताना, बैल अचानक बिथरल्याने (बुजाडल्याने) बैलाच्या जु-वखराच्या आणि दोराच्या मध्यभागी अडकून गंभीर मार लागल्याने एका ६० वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना २९ मे २०२६ रोजी दुपारच्या सुमारास मुर्तीजापूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिरपूर शेत शिवारात घडली. अशोक मोतीराम डाहाके वय ६० वर्ष, रा. हिरपूर, ता. मुर्तीजापूर असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, मृत अशोक डाहाके हे नेहमीप्रमाणे २९ मे रोजी सकाळी ६:०० वाजताच्या सुमारास त्यांच्या नवीन बैलांना घेऊन हिरपूर शिवारातील स्वतःच्या १२ एकर शेतात वखरणी करण्यासाठी आणि नवीन बैलांना वखराची सवय (सुती) लावण्यासाठी गेले होते. दररोज साडे नऊ वाजेपर्यंत घरी परतणारे डाहाके बराच वेळ झाला तरी घरी न आल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, फोनला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.त्यामुळे चिंताग्रस्त झालेली त्यांची मुलगी रेणुका ही वडिलांना पाहण्यासाठी शेतात गेली असता, तिला तिचे वडील शेताच्या धुऱ्यावर पडलेले दिसले. तिने तात्काळ घरी येऊन ही माहिती दिली.

# निधी उपलब्ध असलेली कामे रखडता कामा नये- खा. अनुप धोत्रे



## नियोजन भवनातील बैठकीत अधिकाऱ्यांना निर्देश

प्रतिनिधी ३० मे

**अकोला :** केंद्र शासनाच्या विविध योजनांतून जिल्ह्यात रस्ते, स्वच्छता व पाणीपुरवठ्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जातो. अशी कामे रखडता कामा नयेत. ती वेळेत पूर्ण व्हावीत. आवश्यक कामांचे वेळेत प्रस्ताव द्यावेत, तसेच केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांना करून द्यावा, असे निर्देश खासदार अनुप धोत्रे यांनी दिले.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची समितीची बैठक शुक्रवारी खा. अनुप धोत्रे यांच्या अध्यक्षतेत नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार नितीन देशमुख, महापौर शारदा खेडकर, जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, उपमुख्य कार्य अधिकारी दिगंबर लोखंडे, महापालिकेचे आयुक्त सुनील लहाने यांच्यास सदस्य, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत २०२१-२२ दरम्यान मंजूर असलेले १०५.३१ किमी लांबीचे ९ रस्ते बांधकामाचे काम पूर्ण झाले. २०२२-२३ मधील १०.७० किमी लांबीचे काम पूर्ण झाले. अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण नसल्याच्या तक्रारी येतात. अशा कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचे निर्देश खा. धोत्रे यांनी दिले. हिवरखेड येथील नदीत मर्यादेबाहेर उत्खनन झाल्याची तक्रार आहे. ही बाब गंभीर असून, त्याची तपासणी करावी व अनधिकृत खनन झाले असल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी, असेही निर्देश देण्यात आले. मुर्तिजापूर रेल्वे स्थानकावरील वाहन पार्किंग, लिफ्ट आदी सुविधा त्वरित सुरू कराव्यात.

# गांजाची वाहतूक करणाऱ्या तिघांना अटक

## 5 लाख 25 हजारांचा मुद्देमाल जप्त, खदान पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी ३० मे

**अकोला :** खदान पोलिस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थ गांजाची वाहतूक होत असल्याच्या माहितीवरून पोलिसांनी धडक कारवाई करीत ३ जणांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून गांजासह ऑटो असा ५ लाख २५ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

प्राप्त माहितीनुसार, २९ मे रोजी पोस्टे खदान येथे हजर असताना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, सिंधी कॅम्प येथून बार्शिटाकळी येथे एका ॲटोमध्ये अंमली पदार्थ गांजाची वाहतूक होणार आहे.या माहीती वरून खदान पोलिस स्टेशनचे अधिकारी व



डी.बी. पथक स्टाफ यांनी गुरूनानक शाळा सिंधी कॅम्प अकोला येथे सापळा रचला. तसेच अंमली पदार्थ गांजा रेड करून पोस्टे खदान येथे कलम ८ (क) २० (ब) २ (ब) एन.डि.पी.एस अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करून कायदेशिर कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान घटनास्थळावरून आरोपी शेख शारीक शेख जाकीरोद्दीन (२६) रा. भगतवाडी डाबकी रोड अकोला, शेख तौफीक शेख रफीक (२६) रा. भगतवाडी डाबकी रोड अकोला व मो. इमरान खान कयुब खान (२३) रा. भगतवाडी डाबकी रोड अकोला यांना अटक केली. आरोपीच्या ताब्यातून गांजा वजन ४ किलो ९४० ग्रॅम किं अं. १ लाख २५ हजार, एक ऑटो क्रमांक एमएच ३० बीसी ४६४१ किं.अं.३ लाख रूपये, ३ मोबाईल १ लाख रूपये आणि नगदी ३०० रूपये, असा ५ लाख२५ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## शनिवार ते सोमवार वादळीवाऱ्यासह पावसाचा अंदाज

प्रतिनिधी ३० मे

**अकोला:** हवामानात होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर, नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने अकोला जिल्ह्यासाठी एक महत्त्वाचा अंदाज वर्तवला आहे. येत्या शनिवार ३० मे ते सोमवार १ जून दरम्यान जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता आहे. या काळात हवेचा वेग ताशी ४० ते ५० किमी राहू शकतो.

उष्णतेच्या लाटेने होरपळणाऱ्या अकोलेकरांना दिलासा देणारी ही बातमी आहे. गेल्या काही दिवसांपासून मे हिटपासून त्रस्त अकोलेकर आता सुखावणार आहेत. अकोला जिल्ह्यात शनिवार ३० मे ते सोमवार १ जूनदरम्यान काही ठिकाणी विजाच्या कडकडासह पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे. यादरम्यान ताशी ४० ते ५० किमी प्रतितास याप्रमाणे हवेचा वेग राहण्याची शक्यता आहे. अशावेळी आवश्यक ते कारण असल्याशिवाय घराबाहेर पडू नका, जनावरांना झाडांना किंवा वीजेच्या तारेच्या खाली बांधू नका. वीज, वारा व पावसापासून बचावाकरिता सुरक्षीत ठिकाणी आश्रय घेण्यात यावा. अशा स्थितीत झाडाखाली आश्रय घेऊ नये. पाऊस व विजाच्या स्थितीत मोबाईल फोनचा उपयोग टाळावा. शेतकऱ्यांनी आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. सर्व यंत्रणांनी योग्य ती दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात आली आहे. आज अकोल्याचे तापमान सरासरी दोन अंशांनी घटले असून आजचे अकोल्याचे तापमान हे केवळ ४३ अंश सेल्सिअस इतकेच होते.

# अमरावतीच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांचा अकोला दौरा

प्रतिनिधी ३० मे

**अकोला:** अमरावती विभागाचे नवनियुक्त विशेष पोलीस महानिरीक्षक (आयजीपी) महेश पाटिल यांनी आज शनिवारी ३० में रोजी, पदभार स्वीकारल्यानंतर अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाला पहिली भेट दिली. आयजीपींचे सलामी देऊन स्वागत करण्यात आले.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, जिल्ह्यातील सर्व सीडीपीओ आणि पोलीस अधिकाऱ्यांसोबत त्यांनी बैठक घेतली. आगामी सणांना घेऊन कायदा आणि सुरक्षा, जिल्ह्यातील



अवैध धंदे आणि संबंधित गुन्हेगारी यावर चर्चा करण्यासाठी त्यांनी ही बैठक घेतली जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात त्यांचे आगमन होताच जिल्हा पोलीस अधीक्षकांनी त्यांचे स्वागत केले. पदभार स्विकारल्यानंतर विशेष पोलिस महानिरिक्षक महेश पाटील यांचा हा पहिलाच अकोला दौरा असल्याने पोलिस विभागामध्ये त्यांच्या आगमनाची उत्सूकता होती. यावेळी झालेल्या बैठकीत त्यांनी अकोला शहर व जिल्हाचा क्राईम ग्राफ कमी करण्याकडे पोलिस विभागाने लक्ष द्यावे असे निर्देशही त्यांनी दिले .

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK